POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-९९ ● मुंबई, मंगळवार, ११ नोव्हेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## प्रचंड गर्दीचे ठिकाण असलेल्यालाल किल्ला परिसरात स्फोट

## हरयाणात स्फोटके जप्त, अहमदाबादमध्ये विषाचा कट, काय चाललंय?

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

प्रचंड गर्दीचे ठिकाण असलेल्या दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ आज संध्याकाळी स्फोट झाला. या स्फोटात एकाचा मृत्यू आणि अनेक जण जखमी झाल्याची माहिती स्थानिकांकडून सांगण्यात येते. त्याचवेळी हा कारमधील स्फोट आहे की घातपात, याचीही माहिती घेतली जात आहे. सध्या तरी अग्निशमनच्या सात गाड्या आग विझवत आहेत. मेट्रो स्टेशनच्या गेट नं. १ जवळ कारमध्ये हा स्फोट झाला. हा स्फोट इतका भीषण होता की त्यामुळे आजूबाजूच्या ८ ते १० गाड्यांनाही आग लागली. ही घटना सायंकाळी ६.५५ मिनिटांनी घडली आणि लगेचच अग्निशमन दलाला फोन आले. त्यानंतर तातडीने अग्निशमनच्या गाड्या घटनास्थळी रवाना झाला. पुरानी दिल्ली अशी ओळख असलेल्या लाल किल्लापासून




अर्धा किलोमीटवर मेट्रो स्टेशनजवळ कारमध्ये हा स्फोट झाला. गंभीर बाब म्हणजे सोमवारीच (१० नोव्हेंबर) हरयाणामध्ये एक मोठा दहशतवादी कट उधळल्याचे समोर आले आहे. फरीदाबादमधील एका डॉक्टरच्या घरी छापा टाकून जम्मू काश्मीर पोलिसांनी अंदाजे ३५० किलो आरडीएक्स जप्त केले आहे. तसेच, दोन एके-५६ आणि काही दारुगोळाही सापडला आहे. तर गुजरातच्या दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) एक मोठा कट उधळून लावला. एरंडीच्या बियांपासून तयार केलेले 'रिसिन' नावाचे विष तयार करुन त्याचा हल्ला देशात करण्याचा कट उधळून लावण्यात आला. या कारवाईत एका एमबीबीएस डॉक्टरचाही समावेश होता. चीन मधून शिक्षण घेऊन हा डॉक्टर आला होता. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आले आहे. त्यांच्याकडून शस्त्रसाठाही जप्त करण्यात आला. हरियाणा आणि अहमदाबादमधील घटनांचा संदर्भ लक्षात घेता हा दिल्लीतील स्फोट हा दहशतवादी कारवायांचा भाग असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

### उधळला मोठा दहशतवादी कट

#### डॉक्टरच्या घरातून ३५० किलो स्फोटके, २ एके-४७ अन् दारूगोळा जप्त

हरयाणामध्ये एक मोठा दहशतवादी कट उधळल्याचे समोर आले आहे. हरयाणामधील फरीदाबाद येथे एका डॉक्टरच्या घरी छापा टाकताना जम्मू काश्मीर पोलिसांनी अंदाजे ३५० किलो आरडीएक्स जप्त करण्यात आली आहेत. तसेच, दोन एके-५६ आणि काही दारुगोळाही सापडला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, डॉक्टरचे नाव आदिल अहमद असून जम्मू काश्मीर पोलिसांनी ७ नोव्हेंबर रोजी उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथून त्याला अटक केली होती. सध्या त्याची कसून चौकशी सुरु असून त्याने फरीदाबादमध्ये स्फोटके साठवल्याचे कबूल केले होते. तपासामध्ये हेही समोर आले की, आदिल हा आधी अनंतनाग येथील जनरल रुग्णालयात कार्यरत होता. 7 नोव्हेंबर रोजी डॉ. आदिलच्या माहितीवरून पोलिसांनी आणखी एक डॉक्टर मुजाहिल शकीलला काश्मीरमधील



पुलवामा येथून अटक करण्यात आली आहे. अटकेत असलेल्या डॉक्टर आदिल अहमदने तीन महिन्यांआधी फरिदाबादमधली खोली सामान ठेवण्यासाठी भाड्याने घेतली होती. आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार, तीन डॉक्टर या संघटनेशी संबंधित होते. यापैकी दोन डॉक्टर, आदिल अहमद राथेर हा अनंतनागचा रहिवाशी आहे. तर मुझम्मिल शकील हा पुलवामाचा रहिवाशी आहे. तसेच तिसरा डॉक्टर अजूनही फरार आहे. हे डॉक्टर दहशतवादी संघटना अंसार गजवत-उल-हिंदशी संबधित असल्याची माहिती समोर आली आहे.



### दिल्लीसह महत्त्वांच्या शहरांची रेकी, विषाचे इंजेक्शन तयार

### दहशतवाद्यांचा कट एटीएसने उधळला

गुजरातच्या दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) एक मोठा कट उधळून लावला. एरंडीच्या बियांपासून तयार केलेले ह्यरिसिनह्ण नावाचे विष तयार करुन त्याचा हल्ला देशात करण्याचा कट उधळून लावण्यात आला. या कारवाईत एका एमबीबीएस डॉक्टरचाही समावेश होता. चीन मधून शिक्षण घेऊन हा डॉक्टर आला होता. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आले आहे. त्यांच्याकडून शस्त्रसाठाही जप्त करण्यात आला. अटक करण्यात आलेल्यांमध्ये डॉ. अहमद मोहियुद्दीन सय्यद, आझाद सुलेमान शेख आणि सुहेल मोहम्मद सलिम या तिघांचा समावेश आहे. त्यांच्याकडून चार लिटर एरंडीचे तेल, तीन रिव्हॉल्व्हर, 30 काडतुसे, तीन मोबाईल आणि दोन लॅपटॉप जप्त करण्यात आले आहे. तिन्ही संशयितांनी अहमदाबाद, दिल्ली आणि लखनऊ या तीन प्रमुख ठिकाणांसह अनेक ठिकाणांची रेकी केली होती. या विष कटातील म्होरक्या मध्य आशियातील खुरासान येथील ह्यइस्लामिक स्टेटह्णशीसंबंधीत असल्याची माहिती आहे. एटीएसने दिलेल्या माहितीनुसार, डॉ. सय्यद हा उच्चशिक्षित आहे. तो कट्टरवादी असून त्याने दहशतवादी करावायांसाठी फंड गोळा करणे आणि कारवायांसाठी मुलांना भरती करणे अशी योजना आखली होती. खुरासान येथील दहशतवाद्यांसोबत तो संपर्कात होता. खुरासान येथील म्होरक्या त्यांना पाकिस्तानातून ड्रोनच्या माध्यमातून शस्त्र पाठवत होता.

## नगरपालिका आणि नगर पंचायतींसाठी अर्ज भरण्यास सुरुवात... अनेक ठिकाणी स्वबळाचा नारा

### राजकीय नेत्यांकडून स्वबळाचे संकेत

विधानसभा निवडणुकीत फटका बसल्यानंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये युती वा आघाडीबाबत राज्य पातळीवर काहीच चर्चा झालेली नाही. तर दुसरीकडे महायुती सुद्धा काही जागा सोडल्यास स्वबळाचा नारा देताना दिसत आहे. महत्त्वाचे म्हणजे स्थानिक पातळीवर निर्णयांचे अधिकार सर्वच राजकीय पक्षांनी दिल्याने सोयीच्या आघाड्या वा समीकरणे जुळण्याची शक्यता आहे. कारण आघाडी आणि युतीत वाट्याला कमी जागा येतात, त्यामुळे पक्षातील इच्छुकांचा हिरमोड होतो. म्हणूनच परिस्थिती लक्षात घेऊन निर्णयाचे अधिकार स्थानिक नेत्यांना देण्यात आले आहेत. याचपार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडीतील अनेक नेते स्वबळाचा नारा देताना दिसत आहेत.

■मुंबई। प्रतिनिधी,

गेल्या काही वर्षांपासून लांबणीवर पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या ३१ जानेवारीपर्यंत घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाकडून देण्यात आले होते. त्यानुसार आता राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी ४ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषद घेत पहिल्या टप्प्यात नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांची घोषणा केली आहे. राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेतल्या जाणार आहेत. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सोमवारपासून (१० नोव्हेंबर) सुरू होत आहे.





सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर पहिल्या टप्प्यात २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतीच्या निवडणुका होत आहेत. या माध्यमातून एकूण ६ हजार ८५९ सदस्य आणि २८८ अध्यक्षांची निवड होणार आहे. ज्या २४६ नगर परिषदांमध्ये निवडणूक होणार आहे, त्यामध्ये १० नवीन नगरपरिषदांचा समावेश आहे. तर ४२ नगरपंचायतींसाठी निवडणूक होत आहे. तसेच यात १५ नवीन नगरपंचायतींचा समावेश आहे. नगर परिषदा आणि नगर पंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवारांचे अर्ज ऑनलाइन स्वीकारले जाणार आहेत. एका उमेदवाराला जास्तीत जास्त ४ प्रभागात अर्ज दाखल करता येतील.

उमेदवारी अजासीबत जातवैधता प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. जर एखाद्याने जातवैधतेसाठी अर्ज केला असेल तर त्याची पावती लागेल. त्यानंतर मतदान केंद्रनिहाय याद्या ७ नोव्हेंबरला प्रकाशित होईल. तसेच १० नोव्हेंबरला नामनिर्देशन पत्र, १७ नोव्हेंबरला अंतिम मुदत, १८ नोव्हेंबरला छाननी, २१ नोव्हेंबरला अर्ज माघारी घेण्याची तारीख, २६ नोव्हेंबरला निवडणूक चिन्ह वाटप, २ डिसेंबर रोजी मतदान आणि ३ डिसेंबर रोजी निकाल लागणार आहे.


## काशिगाव येथे महापालिकेची अनधिकृत झोपड्यांवर कारवाई

■भाईंदर। प्रतिनिधी,

काशिगाव येथील मौजे काशी येथील आरक्षण क्रमांक ३२० या जागेत भूमाफियांनी अनधिकृत झोपड्या बांधल्या आहेत. याबाबत अनेक तक्रारी करून देखील महापालिकेकडून कारवाई करण्यात येत नव्हती. त्यामुळे त्याठिकाणी १०० पेक्षा जास्त झोपड्या बांधण्यात आल्या होत्या. या अनधिकृत झोपड्यांवर महापालिका प्रभाग क्रमांक ४ यांनी तोडक कारवाई करून ५० झोपड्या तोडत कारवाई केली आहे.

तसेच या बेकायदा झोपड्यांमुळे मूळ लाभार्थ्यांना सोयी सुविधांपासून वंचित राहावे लागत होते. मिरा-भाईंदर महापालिकेचे शहरात अनेक ठिकाणी आरक्षित भूखंड आहेत. यातील काही भूखंड महापालिकेने ताब्यात घेतले आहेत. तर काही भूखंड ताब्यात घेणे बाकी आहे. महापालिकेने आरक्षित भूखंडावर फलक लावणे आवश्यक आहे. फलक लावलेले नसल्यामुळे काही आरक्षित जागांवर भूमाफिया हे अनधिकृत झोपड्या बनवून विकत आहेत. यामध्ये गरीब नागरिकांची फसवणूक केली जात आहे. याबाबत तक्रारी केल्या तरी देखील कारवाई केली जात नसल्याने महापालिकेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते.

काशीगांव पोलीस ठाण्याच्या



बाजूलाच महापालिकेचे आरक्षण क्र. ३२० आहे. या जागेचा टीडीआर जागा मालकाला दिल्यानंतर महापालिकेने ती जागा ताब्यात घेतली. या जागेवर महापालिकेने बीएसयूपी योजनेतील लाभार्थ्यांसाठी तात्पुरत्या स्वरूपातील संक्रमण शिबिरातील रहिवाशांसाठी १८० फायबर सीट्सच्या खोल्या बांधल्या. तर उर्वरित जागा महापालिकेने खाली ठेवली होती. याचा गैरफायदा घेत स्थानिक भूमाफियांनी त्या जागेवर अनधिकृत झोपड्या बांधण्यास सुरूवात केली. त्यावेळी महापालिकेने कारवाई केली नाही. त्याचाच फायदा घेत त्यानंतर १०० पेक्षा जास्त झोपड्या बांधण्यात आल्या. या झोपड्या बीएसयूपी योजनेतील मूळ लाभार्थी असल्याचे दाखवण्यात आले. अनेक तक्रारदारांनी प्रभाग अधिकार्यांकडे अनेकदा तक्रारी केल्या होत्या. परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

या भूमाफियांकडून महापालिकेच्या आरक्षित जागेत १०५ खोल्या बांधून त्यातील काही खोल्या ४ हजार रुपये महिना भाड्याने देण्यात आल्या होत्या तर काही खोल्या गरीब आणि गरजूंना सुमारे ९ ते १० लाख रुपयांना विकण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या झोपड्यांवर कारवाई करण्याबाबत वारंवार तक्रारी केल्यामुळे प्रभाग अधिकारी स्वप्निल सावंत यांच्या नियंत्रणाखालील पथकाने शुक्रवारी त्या अनधिकृत झोपड्यावर तोडक कारवाई करून १०५ झोपड्यांपैकी ५० झोपड्यांवरच कारवाई करण्यात आली आहे. उर्वरित झोपड्यांवर देखील कारवाई करण्यात येणार असल्याचे सावंत यांनी सांगितले आहे.

## उरणमध्ये बेकायदा 'यार्ड' दरमहा कोट्यवधींची उलाढाल, सिडकोचा कारवाईचा इशारा

■पनवेल। प्रतिनिधी,

जेएनपीए आंतरराष्ट्रीय बंदरातून ये-जा होणाऱ्या कंटेनर यार्डसाठी बेकायदा यार्ड उभारून दरमहा कोट्यवधींची उलाढाल होत आहे. नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोची परवानगी घेण्यात आलेली नाही. याच परिसरात सिडकोचा लॉजिस्टिक पार्कचा प्रस्ताव असताना बेकायदा कंटेनर यार्डकडे दुर्लक्ष केले जात आहे.

उरण तालुक्यात असलेल्या जेएनपीए बंदरातून दरवर्षी लाखो कंटनेरची उलाढाल होते.



### वहाळमध्ये बेकायदा आरएमसी प्रकल्प

आर. के. पाटील इन्फ्रा प्रा. लिमिटेड कंपनीचा वहाळ ग्रामपंचायत हद्दीत पुष्पक नोड येथे आर. एमसी प्रकल्प, क्रशर, मिक्सर, मशीन पूर्ण बांधकाम बेकायदा असल्याचे सिडकोने जाहीर केले आहे. राजकीय वरदहस्तामुळे यावर वर्षानुवर्षे कारवाई केली जात नाही. जाहीर प्रकटनानंतर सिडको प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जगभरातून ये-जा करणाऱ्या कंटेनरला गोदाम आणि कंटेनर यार्डची गरज असते. नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोने कंटेनर यार्डसाठी लॉजिस्टिक पार्कची उभारणी करणे गरजेचे होते. परंतु अद्याप याची उभारणी झालेली नाही. याचा गैरफायदा घेऊन उरणच्या चिर्ले, वेश्वी, जासई ग्रामपंचायत हद्दीत बेकायदा गोदाम आणि कंटेनर यार्ड उभारलेली आहेत. सिडकोची परवानगी न घेता शिपिंग कंपन्या दरमहा लाखो रुपयांचे भाडे जमा करत आहेत.

सुरुवातीला स्थानिक शेतकऱ्यांच्या मालकीची जमीन शेतकऱ्यांकडून विकत घेऊन वेगवेगळ्या कंपन्यांनीच कंटेनर यार्ड उभी केली आहेत. सिडकोने ८ नोव्हेंबरला नवी मुंबईतील विभागवार बेकायदा बांधकामांची यादी प्रसिद्ध केली आहे. यामध्ये सर्वाधिक संख्या उरणमधील कंटेनर यार्डची आहे. उरण तालुक्यातील चिर्ले ग्रामपंचायत हद्दीतील गावठाण, जांभूळपाडा वेश्वी ग्रामपंचायतीतील बेलोंडेखार आदी गावांमध्ये कंपन्यांची सुमारे २२ कंटेनर यार्ड आहेत. कंटेनर यार्डसाठी जमिनीवर भराव टाकून सपाट भूभाग तयार केले आहेत.

## ओशिवरा पोलिस ठाण्यात तक्रारदाराशी गैरवर्तन महागात

## २ संबंधित पोलिस अधिकारी निलंबित



### घटना काय?

ही घटना ४ नोव्हेंबरच्या संध्याकाळी घडली. त्यावेळी एका राजकीय पक्षाचे १० ते १५ कार्यकर्ते ओशिवरा पोलिस ठाण्यात आले होते. जोगेश्वरी (पश्चिम) येथील गुप्ता किराणा दुकानाजवळ एका कुटुंबावर दुसऱ्या कुटुंबाने हल्ला केल्याची तक्रार देण्यासाठी ते आले होते. त्याच वेळी, एका अल्पवयीन मुलीसह तिची आईही एका युवकाकडून छेडछाडीच्या तक्रारीसाठी पोलिस ठाण्यात आली होती.

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईतील ओशिवरा पोलिस ठाण्यात तक्रारदारांशी गैरवर्तन केल्याच्या आरोपानंतर दोन सहाय्यक पोलिस निरीक्षकांना निलंबित करण्यात आलं आहे. तसेच पाच पोलिसांविरोधात चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. विभागीय पोलिस उपायुक्त (क्षेत्र ९) दीक्षित गेडाम यांनी ही कारवाई केली आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली असून संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांना सात दिवसांच्या आत स्वस्पष्टीकरण अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. योग्य कायदेशीर प्रक्रिया न पाळता पोलिस दलाची प्रतिमा मलिन केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. यावेळी कार्यकर्त्यांनी तत्काळ कारवाईची मागणी केली. पोलिस अधिकाऱ्यांनी योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल, असं सांगितलं. मात्र परिस्थिती तणावपूर्ण झाली आणि काही पोलिसांवर गैरवर्तनाचे आरोप झाले. योग्य कायदेशीर प्रक्रिया न पाळता त्यांनी कार्यकर्त्यांशी उद्धट वर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश ७ नोव्हेंबर रोजी जारी करण्यात आले. सहाय्यक पोलिस निरीक्षक रमेश केंगार आणि गणेश गायके, पोलिस उपनिरीक्षक बाबू तोत्रे आणि दीपक बर्वे, तसेच पोलिस शिपाई अजिम झारी यांच्याविरोधात चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

## आता पोलिसांच्या पडताळणीचेही व्हेरिफिकेशन होणार... नेमकं प्रकरण काय?

■मुंबई। प्रतिनिधी,

काही दिवसांपूर्वी दहिसरमध्ये बनावट कागदपत्रांवर अर्ज केलेला पासपोर्ट अर्ज मंजूर केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी निवृत्त सहाय्यक उपनिरीक्षक संजय जगताप यांना अटक केली होती. २०२३ मधील हे प्रकरण असून पोलिसांनी यापूर्वी या प्रकरणात सतीश ढाकणे, नीलेश तिवारी आणि पंकज कुमार सिंग या तीन आरोपींना अटक केली होती. त्यानंतर ३१ ऑक्टोबर रोजी जगताप निवृत्त झाल्यानंतर पोलिसांनी त्यांनाही 5 नोव्हेंबर रोजी अटक केली. पण, यानंतर गुप्तचर शाखेने स्थानिक पोलिसांकडून मिळालेल्या पासपोर्ट कागदपत्रांची तपासणी सुरू केली आहे.

बीएमसी कार्यालयाकडून ११ सप्टेंबर २०२५ रोजी आलेल्या उत्तरात असे म्हटले की, प्रमाणपत्रात जन्मतारीख, पालकांची नावे आणि नोंदणी तपशीलांमध्ये तफावत आहे. तपास अहवालात स्पष्टपणे म्हटले की प्रमाणपत्र बनावट आहे. त्यानंतर, दोन दिवसांपूर्वी डोंगरी पोलिसांनी पासपोर्ट कायद्याच्या कलमांखाली आणि फसवणुकीअंतर्गत व्यक्तीविरुद्ध





एफआयआर नोंदवला. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, राजेंद्र उर्फ राजिंदर उर्फ जिंदर गुरु वचन सिंग नावाचा एक कुख्यात गुन्हेगार, ज्याच्यावर पंजाब, हरियाणा तसेच राजस्थानमध्ये अनेक ड्रग्जचे गुन्हे दाखल होते. त्याला एका प्रकरणात दोषी ठरवण्यात आले. २०२३मध्ये वैद्यकीय कारणास्तव तो तुरुंगातून सुटला आणि मुंबईत गेला. तो त्याची पत्नी बलजीत कौर आणि ७ वर्षांच्या मुलीसह दहिसरमध्ये भाड्याच्या घरात राहायला गेला. ढाकणे, तिवारी आणि सिंग यांच्या मदतीने वचन सिंगने आधार कार्डसह बनावट कागदपत्रे मिळवली.

डोंगरी पोलीस ठाण्यातील पोलिस कॉन्स्टेबल संतोष नवले मोरे यांनी दाखल केलेल्या एफआयआरमध्ये असे म्हटले आहे की, मस्जिद बंदर येथील वाडी बंदर येथील ३० वर्षीय व्यक्तीने नवीन पासपोर्टसाठी अर्ज केला. पासपोर्ट केंद्रात त्याने त्याच्या आईचे जन्म प्रमाणपत्र तसेच इतर कागदपत्रे सादर केली. या प्रमाणपत्रावर बीएमसीच्या बी-वॉर्डचा परिपत्रक शिक्का आणि स्वाक्षरी होती. गुप्तचर शाखा किंवा विशेष शाखा २ ने प्रमाणपत्राची पडताळणी केली तेव्हा ते संशयास्पद आढळले. ३ मे २०२५ रोजी विशेष शाखेने डोंगरी पोलीस ठाण्याला एक अहवाल पाठवला. यामध्ये प्रमाणपत्र खरे आहे की बनावट? याची चौकशी करण्याचे निर्देश दिले. या आधारे ८ मे २०२५ रोजी डोंगरी पोलिसांनी जन्म प्रमाणपत्राची सत्यता पडताळण्यासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी तसेच उपनिबंधक (जन्म आणि मृत्यु), बृहन्मुंबई महानगरपालिकेचे बी-वॉर्ड यांना पत्र पाठवले.

२०२३मध्ये त्याने स्वतःच्या, त्याच्या पत्नीच्या आणि त्याच्या मुलीच्या नावावर या बनावट कागदपत्रांचा वापर करून पासपोर्टसाठी अर्ज केला. त्यावेळी जगताप दहिसर पोलिस ठाण्यात पासपोर्ट पडताळणी शाखेत हेड कॉन्स्टेबल म्हणून तैनात होते. त्याने योग्य पडताळणी न करता ही कागदपत्रे मंजूर केली आणि अर्जावर प्रक्रिया केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ही कागदपत्रे २०२१ मध्ये तयार केली गेली असल्याचे दाखवण्यात आले, त्याच वेळी वचन सिंग पंजाब तुरुंगात होता. वचन सिंगने पासपोर्ट मिळवला आणि देशाबाहेर पळून गेला. तेव्हा हे प्रकरण उघडकीस आले. काही महिन्यांपूर्वी हरियाणा पोलिसांनी ४ किलो हेरॉइन जप्त केले असून दोघांना अटक केली. चौकशीत असे दिसून आले की वचन सिंग पुन्हा ड्रग्जच्या व्यापारात सहभागी झाला होता आणि परदेशात ड्रग्ज पाठवत होता. पुढील तपासात हरियाणा पोलिसांना असे आढळून आले की वचन सिंगने मुंबईहून पासपोर्ट मिळवला होता. यानंतर हरयाणा पोलीस मुंबईत पोहोचले आणि ही वस्तुस्थिती समोर आल्यावर दहिसर पोलिसांनी या वर्षी मार्चमध्ये जगतापसह ४ जणांविरुद्ध विविध कलमांखाली एफआयआर नोंदवला.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## आणखी एक लढा जनतेच्या हक्कासाठी




**अल्पेश म्हात्रे अंधेरी विकास समितीसह सर्व राजकीय पक्षाच्या लोकांनी एकत्र येऊन सामाजिक कायासाठी स्थापन करण्यात आलेल्या संस्थेतर्फे काही दिवसांपूर्वी अंधेरी पूर्व येथील सेवन हिल्स हॉस्पिटल येथे शेकडो कार्यकर्त्यांसहित मोर्चा काढला. या मोचार्चे नेतृत्व कार्याध्यक्ष दिलीप माने व अध्यक्ष माजी उपमहापौर राजेश शर्मा यांनी केले. उद्देश एकच होता, मरोळ येथील रुग्णालय खासगी उद्योगपतीच्या ताब्यात जाण्यापासून वाचवणे.**

मरोळ-अंधेरी पूर्व हा भाग प्रामुख्याने गरीब व मध्यमवर्गीयांचा भाग आहे. २०१० ला मुंबई महानगरपालिकेतर्फे स्थापन करण्यात आलेल्या सेवन हिल्स या रुग्णालयाचा फायदा आत्तापर्यंत विभागातील बऱ्याच गरीब रुग्णांना मिळालेला आहे. सध्या हे रुग्णालय आंध्र प्रदेश येथील खासगी उद्योगपती चालवतात; परंतु व्यवसायातील नुकसानीमुळे सदरील उद्योगपती दिवाळखोरीत गेला. त्यामुळे हा रुग्णालयाचा विषय न्यायालयात प्रलंबित आहे. असे असताना हे रुग्णालय मुंबई स्थित खासगी उद्योगपतीला विकण्यात येणार अशी बातमी कळल्यामुळे अंधेरीतील जनतेमध्ये प्रचंड रोष आहे. सेवन हिल्स रुग्णालय हे आशिया खंडातील मोठ्या रुग्णालयांमध्ये गणले जाणारे रुग्णालय आहे. त्यामध्ये साधारण १ हजार ५०० खाटा, ३६ विविध ऑपरेशन थेटर, १२० अतिदक्षता विभाग, बरोबरच कर्मचारी वसाहत अशा एकूण १७ एकरमध्ये अद्यावत असे हे रुग्णालय स्थापन करण्यात आलेले आहे. असे रुग्णालय एखाद्या खासगी उद्योगपतीकडे गेल्यानंतर ते पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये रूपांतरित होईल आणि सर्वसामान्य नागरिकांना तेथे उपचार मिळणे तर दूरच; परंतु आतमध्ये प्रवेशही मिळणार नाही, ही रास्त भीती असल्यामुळे अंधेरी विकास समितीने पुढाकार घेऊन या मोचार्ची सविस्तर निवेदने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री आशीष शेलार, तसेच मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, स्थानिक खासदार रवींद्र वायकर, अंधेरी पूर्वचे आमदार मुरजी पटेल यांना सविस्तर दिली असल्याचा त्यांनी उल्लेख केला. स्थानिक आमदार मुरजी पटेल यांनी हा विषय विधान भवनातही उपस्थित केला होता. या विषयाचे गांभीर्य माहीत असल्यामुळे व स्थानिक नागरिकांच्या भावनेला प्रतिसाद म्हणून हा प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने ते स्थानिक नागरिकांसोबतच समितीच्या लोकांच्या सोबत होते. या संघटनेचे अध्यक्ष राजेश शर्मा यांनी रुग्णालयाच्या आर्थिक गणिताबद्दल सविस्तर चर्चा करून हे रुग्णालय महानगरपालिकेतर्फे चालविण्यास कसलीच अडचण असणार नाही असे सांगितले. हे रुग्णालय कुठच्याही खासगी उद्योगपतीस देण्यात आले तर जास्तीत जास्त ३०० ते ४०० कोटी एवढी रक्कम होईल. अशा परिस्थितीमध्ये ७० हजार कोटींचे बजेट असणारे व साधारण ८० हजार कोटी मुदत ठेव असणारे मुंबई महानगरपालिकेला हे रुग्णालय स्वतः चालवण्यास कसलीच अडचण भासणार नाही. रुग्णालय चालवण्यासाठी महिना साधारण पन्नास कोटींचा खर्च अपेक्षित आहे आणि तो जी. एस. टी. व इतर उत्पादनाच्या स्त्रोतामधून सहजगत्या भागवला जाईल, असे त्यांनी सांगितले. तसेच, मुंबईतील जे. जे. हॉस्पिटल के. ई. एम. हॉस्पिटल व सायन हॉस्पिटलच्या धरतीवर हे हॉस्पिटल चालविले जावे जेणेकरून राज्यातील व विभागातील गरीब विद्यार्थ्यांना वाजवी किमतीमध्ये मेडिकल व नर्सिंगचा कोर्स पूर्ण करता येईल व त्याचा जास्तीत जास्त फायदा गरीब विद्यार्थ्यांना होईल. त्याकरिता कुठल्याही परिस्थितीमध्ये हे रुग्णालय मुंबई महानगरपालिकेतर्फे चालविण्यात यावे अशी मागणी करून हे रुग्णालय मुंबई महानगरपालिकेतर्फे चालविले जावे असा आग्रह गेल्या जुलै महिन्यामध्ये मुंबई महानगरपालिका सार्वजनिक खासगी भागीदारी पीपीपी तत्त्वावर रुग्णालयांचा पुनर्वकास करीत होती. त्यानुसार मानखुर्दमधील लल्लूभाई कंपाउंड मल्टीस्पेशालिटी रुग्णालय आणि गोवंडीतील शताब्दी रुग्णालयांचा पुनर्विकास करण्यात येत होता मात्र त्यानंतरही दोन्ही रुग्णालये खासगी संस्थांच्या माध्यमातून चालवण्यात येणार असल्याने रुग्णांना उपचारासाठी अधिक पैसे मोजावे लागणार होते. त्यामुळे स्थानिक रहिवासी, विविध नागरी समूह सामाजिक संघटना स्वयंसेवी संस्था आणि राजकीय पक्षाच्या बावीस अधिक संघटनांनी एकत्र येऊन मुंबई महानगरपालिकेच्या एम पूर्व विभाग कार्यालयासमोर जोरदार आंदोलन केले होते. खरं तर पालिका रुग्णालये म्हटले की अनेक जण नाके मुरडतात. रुग्णालयांमधील स्वच्छता किंवा आरोग्य विषय असुविधा ऐकायला मिळतात मात्र तरीही गोरगरीब जनतेसाठी पालिका रुग्णालय हा आरोग्य विषयक समस्यांसाठी चांगला माफक व सोयीस्कर पर्याय असतो. मुंबईत पालिकेचे कस्तुरबा रुग्णालय हे सरकारी रुग्णालय आहे. या रुग्णालयाला पालिकेकडून अर्थसहाय्य दिले जाते तर मुंबई सेंट्रल येथील नायर रुग्णालय हे उपचार पद्धती आणि इमारतीसाठी प्रसिद्ध आहे. परळ येथील केइएम रुग्णालय हे भारतात प्रसिद्ध असून येथे सामान्य माणसाची रीघ असते तर सायन रुग्णालय हे प्रसिद्ध रुग्णालय आहे. सायन येथील लोकमान्य टिळक रुग्णालय हे मिल्क बँक हायपर्युम ट्रॉमा सेंटरसाठी प्रसिद्ध आहे. या रुग्णालयात दररोज २५० पेक्षा जास्त रुग्ण ॲडमिट होतात आणि तितक्याच नागरिकांना घरी सोडले जाते. मुंबईतील पाच प्रमुख पालिका आणि सरकारी रुग्णालयात दर दिवसाला किमान ५१ रुग्णांचा उपचारा दरम्यान मृत्यू असल्याचे सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे पण त्या रुग्णांमध्ये जे रुग्ण शेवटच्या टप्प्यात खासगी रुग्णालयातून सार्वजनिक रुग्णालयात दाखल होतात त्यांना वाचवण्यात बरीच आव्हाने येतात. या रु आज मुंबई शहरातूनच नव्हे, तर संपूर्ण देशातून या रुग्णालयांकडे रुग्णांची रीघ लागलेली असते. मुंबईत जे. जे. रुग्णालयात सध्या १ हजार ३५२ खाटांची संख्या असून तेथे रोज अडीच हजार जण बाह्य रुग्ण विभागात उपचार घेतात तर रोज साधारण १ हजार २५० रुग्ण दाखल होत असताततं. तर केइएम रुग्णालयात २ हजार २५० खाटांची संख्या असून रोज बाह्य रुग्ण विभागात ६ हजार ५०० रुग्ण उपचार घेतात तर रोज १ हजार ८०० रुग्ण दाखल होतात. सायन येथील टिळक रुग्णालयात १ हजार ९०० खाटा असून तेथे दररोज ६ हजार रुग्ण बाह्य रुग्ण विभागात उपचार घेतात तर दाखल होणाऱ्यांची संख्या ही जवळपास तेवढीच आहे. मुंबई सेंट्रल येथील नायर रुग्णालयात १ हजार ६३२ खाटांची संख्या असून रोज १ हजार २५० रुग्ण बाह्य रुग्ण विभागात उपचार घेतात, तर १ हजार ८०० रुग्ण रोज दाखल होतात. पालिकेच्याच कुपर रुग्णालयात ७०० खाटांची संख्या असून रोज १ हजार ७०० बाह्य रुग्ण विभागात उपचार घेतात तर रोज ५०० रुग्ण दाखल होतात असे काहीही असले तरी आजही मुंबईकरांसाठी ही रुग्णालये अपुरे पडत आहेत हे सिद्ध झालेले आहे. आज त्या रुग्णालयांची पाहणी केली असता अशा रुग्णालयांची कशी आवश्यकता आहे याची खात्री पटते. आज बाहेर खासगी रुग्णालयांकडून जी काही लूट सुरू आहे हे पाहता लोकांचा आजही जास्त भरोसा हा शासकीय रुग्णालयांवरच असतो. काहीही कोणीही, कितीही म्हटले तरी आजही शासकीय रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध असतात तसेच माफक व काही ठिकाणी मोफत अशी रुग्णसेवा सरकारी रुग्णालयात केली जात असते . आजही कित्येक मोठमोठ्या यशस्वी शस्त्रक्रिया या शासकीय रुग्णालयातूनच केल्या जात असतात. त्यामुळे लोकांचा भरोसा हा शासकीय रुग्णालयांवरच असतो. आज मुंबईतील शासकीय रुग्णालयांवर मुंबईकरांपेक्षा बाहेरील रुग्णांचा जास्त भर असतो त्यामुळे मध्यंतरी बाहेरील रुग्णांकडून जास्त दर आकारण्याची योजना बनवण्यात आली होती. कारण मुंबईकरांच्या पैशावर चालणाऱ्या या रुग्णांचा फायदा मुंबई बाहेरील तसेच राज्य बाहेरील इतर नागरिकच जास्त घेत होते मात्र काही कारणास्तव हा प्रस्ताव बाजूला ठेवण्यात आला. आजही शासकीय दरात जमीन पदरात पाडून घेऊन तेथे पंचतारांकित रुग्णालय उभारून सर्वसामान्यांना दूर ठेवणाऱ्या रुग्णालयांकडे बघितले, तर व शासकीय रुग्णालयांच्या दारा बाहेरील गर्दी व तेथील अवस्था व ताण पाहिला तर आजही मुंबईकरांना व मुंबईसाठी शासकीय रुग्णालय किती आवश्यक आहे हे पटते त्यामुळे अंधेरी येथील हे रुग्णालय वाचावे यासाठी अंधेरी विकास समितीला अंधेरी येथीलच येथील नाही, तर संपूर्ण मुंबईतील व प्रत्येक सर्वसामान्य नागरिकांनी मोठा पाठिंबा दिला तरच सर्वसामान्यांसाठी हे रुग्णालय टिकू शकेल नाहीतर हे सुद्धा रुग्णालय हातचे जाईल व मुंबईकरांच्या नशिबी पुन्हा महागडे उपचार येतील. निदान मुंबईची वाढती लोकसंख्या पाहता तरी हे रुग्णालय हातचे जाऊ न देणे ही आपली सर्वांची व सरकारची जबाबदारी आहे हे खरे.

## सर्व पक्षांच्या नेत्यांकडून चाचपणी

देशाचा विकास झपाट्याने करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी मराठवाड्याने यापूर्वी ताकद लावली. तेच चित्र पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दिसणार आहे. भाजपने 'छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड, धाराशिव, लातूर तसेच नांदेड या आठ जिल्ह्यांत विशेष लक्ष केंद्रित केले आहे. मराठवाड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भरपूर कामे केली आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील जनता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपच्या पाठीशी राहणार, असे चित्र आज दिसून येत आहे. 'विकास हेच ध्येय' या धर्तीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्यात विविध विकासकामांना भरभरून निधी दिला. त्याचा फायदा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नक्कीच दिसून येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर मराठवाड्यात सर्व पक्षांच्या नेत्यांकडून चाचपणी केली जात आहे. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना तसेच काँग्रेस पक्षाच्यावतीने मराठवाड्यात विविध नेत्यांनी वेगवेगळ्या विकासकामांच्या उद्घाटन सोहळ्याच्या नावावरून उपस्थिती लावली. जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगर परिषद व महापालिका निवडणुकीत आपल्या पक्षाच्या उमेदवारांना यश मिळावे, यासाठी सर्वपक्षीय नेते जास्तीत जास्त निधी देऊन विकासकामांचा धुराळा उडवीत आहेत. देशाचा विकास झपाट्याने करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी मराठवाड्याने यापूर्वी ताकद लावली. तेच चित्र पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दिसणार आहे. मराठवाड्यातील जनता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कायार्ला विसरणार नाही, असे चित्र दिसून येत आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड, धाराशिव, लातूर तसेच नांदेड या आठ जिल्ह्यांत भाजपने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. मराठवाड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भरपूर कामे केली. त्यामुळे मराठवाड्यातील जनता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपच्या पाठीशी राहणार, असे चित्र आजघडीला दिसून येत आहे. सर्वच पक्षांच्या सभा मराठवाड्यात अलीकडच्या काळात पार पडल्या. त्यावेळी भाजप वगळता अन्य कुठल्याही पक्षाच्या सभांना जास्त गर्दी नव्हती. मराठवाडा हा एकेकाळी शिवसेनेचा गड होता. बाळासाहेब ठाकरे यांना मानणारा मोठा वर्ग मराठवाड्यात होता. त्या पाठोपाठ काँग्रेसने देखील मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत एकेकाळी चांगलेच वर्चस्व गाजविले; परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २०१४ मध्ये पंतप्रधान झाल्यानंतर आजपर्यंत भाजपने केलेली विकासाची घोडदौड संपूर्ण देशभरात चर्चेचा विषय ठरली. त्यानंतर भाजपकडे मतदार झपाट्याने वळू लागला. त्याचप्रमाणे मराठवाड्यात देखील अनेकांनी नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी उभे राहून 'शतप्रतिशत भाजप' हाच नारा विकासाच्या दृष्टिकोनातून स्वीकारला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने मराठवाड्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी देण्यात आला. त्या निधीमुळे मराठवाड्याचा कायापालट झाला व अनेक विकासाची कामे अद्यापही सुरू आहेत. मराठवाड्यात पाण्याची समस्या लक्षात घेऊन वॉटर ग्रीड प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. यापूर्वी तत्कालिन उबाठा गटाचे मुख्यमंत्री यांच्या कार्यकाळात मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प रद्द करण्यात आला होता. मराठवाड्यातील जनतेच्या तोंडचे पाणी पळविण्याचे पाप उबाठाने केल्यामुळे त्यांच्याविषयी मराठवाड्यात चीड निर्माण झाली. भाजपने मात्र कुठलाही दुजाभाव न करता संपूर्ण मराठवाड्यात विकासाला हातभार लावला. त्यामुळेच येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मराठवाड्यातील मतदार नगर परिषद, महापालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपला भरीव प्रमाणात मतदान करण्याच्या मनस्थितीत आहेत. मराठवाड्याच्या सीमेवर तेलंगणा हे राज्य आहे. या ठिकाणी एमआयएमचे खासदार अकबरुद्दीन ओवेसी हे पुन्हा एकदा महापालिका निवडणुकीत नांदेडमध्ये एमआयएमच्या उमेदवारांना पुढे करण्याच्या दृष्टिकोनातून दौरे करत आहेत. यापूर्वी एमआयएम पक्षाच्या १३ नगरसेवकांना निवडून आणण्यात नांदेड महापालिकेत ओवेसी यांना यश आले होते. त्याचबरोबर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देखील नांदेड जिल्ह्यात विशेष लक्ष केंद्रित केले आहे. नांदेडसह लातूर, जालना जिल्ह्यात महापालिका ताब्यात घेण्यासाठी काँग्रेस कामाला लागली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी देखील मराठवाड्यात दौरे वाढविले आहेत. मराठवाड्यातील जास्तीत जास्त जिल्हा परिषदा ताब्यात घेण्यासाठी अजित पवार यांनी आखणी सुरू केली आहे. उबाठाचे नेते देखील शेतकऱ्यांविषयी कळवळा दाखवत मराठवाड्यात फिरत आहेत. मराठवाड्यात शेतकऱ्यांचे झालेले अतिवृष्टीतील नुकसान लक्षात घेऊन भाजपने भरीव मदत केलेली आहे. त्यामुळे मराठवाड्यातील शेतकरी खाल्लेल्या मिठाला जागणारे आहेत. भाजप व्यतिरिक्त अन्य कोणत्याही पक्षाचे नेते शेतकऱ्यांची मते वळवू शकणार नाहीत, असे चित्र सध्या दिसून येत आहे. गेल्या अडीच-तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. त्यादरम्यान भाजप वगळता अन्य कुठल्याही पक्षाच्या नेत्यांनी नागरिकांना जवळ केलेले नाही. लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी भाजपने नेहमीच पुढाकार घेतला. त्याचा फायदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपलाच होणार आहे. येणाऱ्या २० दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील चित्र स्पष्ट होईल. एकंदरीत मराठवाड्यात भाजपला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत 'अच्छे दिन' येतील, असा तर्क राजकीय विश्लेषक लावत आहेत.

## तोच रस्ता, तेच प्रश्न, फक्त निवडणुका नव्या

**पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या रूपाने चांगला अधिकारी पुणे पोलीस दलाला लाभला, आता ते गुन्हेगारी संपवणार, असा विश्वास पुणेकरांना होता. पण, परेड करून दिलेली तंबी गुंडांनी एका कानातून ऐकून दुसऱ्या कानातून सोडून दिली आणि पुन्हा आपले दोन नंबरचे धंदे, मारामाऱ्या सुरू ठेवल्या. याचा अर्थ अमितेश कुमार यांनी जो परेड कार्यक्रम घेतला, त्याचा कुठलाही परिणाम गुन्हेगारांवर झाला नाही. उलट, अमितेश कुमार यांच्या कारकिर्दीत गुन्हेगारी अजून बोकाळल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पुण्यात गुंड झाले उदंड, पोलीस मात्र थंड, अशीच स्थिती दिसत आहे.**

महापालिका निवडणुकींच्या प्रभाग रचना जाहीर झाल्यावर रस्ते, आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक वाहतूक, पाणीपुरवठा, स्वच्छता, बेकायदा बांधकामे या विषयांच्या पलीकडे पालिकांच्या निवडणुका मागील पाच ते सात दशकांपासून गेलेल्या नाहीत. ठाणे, भिवंडी, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर या महापालिकांचा प्रवास नगरपालिका ते महापालिकेपर्यंत जरी झालेला असला तरी नागरिकांचे मूलभूत प्रश्न आजही तेच तसेच कायम आहेत. लोकशाहीतील नागरिकांचा थेट आणि थोडासा औपचारिक तातडीचा संबंध असलेला नगरपालिकांचा विषय म्हणूनच नागरिकांसाठी जिव्हाळ्याचा असतो.

लोकसभा विधानसभेच्या निवडणुकीतील राजकारण आणि सत्तेची गणितं म्हणूनच नगपालिकेच्या निवडणुकीत तेव्हढी कामी येत नाहीत. काही हजारांच्या संख्येनेही प्रभाग रचना असल्याने उमेदवारांचे व्यक्तीगत संबंध महत्वाचे असल्याने पक्षीय राजकारण त्यानंतरचे असते. ठाणे जिल्ह्यातील बहुतांश महापालिका आणि नगरपालिकांच्या प्रभाग रचना जाहीर झाल्या असल्याने आता नागरिकांच्या मूलभूत सुविधांची चर्चा आणि त्याचे राजकारणही सुरू झाले आहे. नागरी सेवांच्या इतर विभागांच्या तुलनेत रस्ते विकासाच्या प्रश्नावर तुलनेने आर्थिक गैरव्यवहाराचे जास्त आरोप होत असतात.

ठाण्यातील नागरी क्षेत्रातही हा प्रश्न कित्येक दशकांपासून कायम आहे. अगदी पंचायत समितींच्या रस्ते कामांपासून ते शहरातील रस्त्यांमध्येही निविदांपासून ते टक्केवारी, कामाचा दर्जा, विलंब याविषयी आवाज उठवले जातात, रस्त्यांसाठी आंदोलने, उपोषणे केली जातात. खड्डे भरण्याच्या, डांबरीकरणापासून ते काँक्रिटीकरणाच्या कामापर्यंत रस्ते विकासासाठी मंजूर झालेला शेकडोंचा निधी हजारोंच्या घरात गेल्यानंतरही कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह कायम राहते. पालिका निवडणुकांना काही महिन्यांचा अवकाश असताना रस्त्यांच्या कामांना उत आला आहे. ठाणे क्षेत्रात रस्त्यांच्या नव्या कामे, लोकार्पणांना सुरुवात आताशा झाली आहे. हे सगळे पालिका निवडणुकांना डोळ्यांसमोर ठेवून केले जात आहे.

भिवंडी तालुक्यातील चिंचोटीकडे जाणाया रस्त्यांच्या कामावर भ्रष्टाचाराचा आरोप झाला. यातील अधिकार्यांच्या खातेनिहाय चौकशीची मागणी झाली. भिवंडी-चिंचोटी रस्त्याची मागील अनेक वर्षांपासून दयनीय अवस्था होती. चार वर्षात किंवा त्याआधीही या कामाकडे कुणाचेही लक्ष नव्हते, आता अचानक या रस्ते दुरवस्थेची आठवण पालिकेच्या अधिकार्यांना झाली आहे. या रस्त्याच्या कामांची जवळपास ४० कोटी रुपयांची बोगस बिले काढल्याचा आरोप अधिकार्यांवर स्थानिक राजकीय नेत्यांनी केला आहे. ठाणे जिल्हाधिकार्यांकडे चौकशीची लेखी तक्रार करण्यात आली आहे. हे महापालिका असलेल्या शहरातील प्रातिनिधीक उदाहरण म्हणाले, शहापूरसारख्या ग्रामीण भागतही वेगळी परिस्थिती नाही.

पालिकांच्या तुलनेत ग्रामीण भागांना मिळणारा निधी आणि महसूल कमी असल्याने या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचार्यांच्या पगारावर होणारा खर्च परवडणारा नाही. त्यामुळे नव्या भरतींना सरकाकडून मंजुरीच मिळत नाही. शहापूर तालुक्यातील जिल्हा महामार्ग तसेच गावपाड्यांना जोडणाया रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. शासनाने मैल कामगार भरती कायमची बंद केल्याने या रस्त्यांच्या निगराणीचा प्रश्न गंभीर बनला आहे. तालुक्यातील सुमारे ५२७ ग्रामीण रस्ते आणि १४ जिल्हा महामार्गाच्या कडेला मोठ्या प्रमाणात झाडे-झुडपे वाढल्याने अपघातांचा धोका आहे. पूर्वी जिल्हा परिषद बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागातील मैल कामगार पावसाळ्यानंतर रस्त्यांच्या साईड पट्ट्यांवरील झाडे झुडपे साफ करून रस्ता सुस्थितीत ठेवत असत. मात्र, आता भरती बंद झाल्याने आणि सेवेतील कामगार सेवानिवृत्त झाल्याने हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच कामगारांकडून कामे केली जात आहेत. कल्याणात विकासकामांच्या भूमिपुजनाचा राजकीय धडाका सुरू झाला आहे.

पालिकेवरील प्रशासकीय राजवटीमुळे लोकप्रतिनिधींना लोकांनी विचारलेल्या प्रश्नातून पळवाटेची सोय होती. मात्र आता निवडणुकीचे वेध लागल्यावर हीच पळवाट गैरसोयीची झाली आहे. केलेल्या कोणत्या कामांच्या बळावर आपण मते मागावी, असा प्रश्न केडीएमसीतील लोकप्रनिधींना पडला आहे. त्यामुळे घाईघाईत कामांचे शुभारंभ करून कित्येक जुन्याच कामांचे श्रेय घेण्यासाठी राजकारण्यांची चढाओढ लागली आहे. बदलापूर, अंबरनाथमध्ये रस्ते रुंदीकरणाचा प्रश्न कित्येक वर्षे जुनाच आहे. बदलापूरमध्ये ६ मीटरचे रस्ते ९ मीटर करण्याची योजना १७ वर्षे जुनी असल्याने पालिका निवडणुकांमुळे हा विषय पुन्हा समोर आणला गेला आहे. निवडणुका संपल्यावर पुन्हा हा विषय बासनात गुंडाळून ठेवल्याचा अनुभवही बदलापूरकरांना नवा नाही. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना ठाणे शहर राजकारणाचा केंद्रबिंदू होते.

शिवसेनेच्या शिंदे गटाची सगळी राजकीय मदार याच शहराच्या राजकारणावर असल्याने एकनाथ शिंदे यांनी येथील पालिका, नगरपालिकांवरही आपली पकड सैल न होण्याची काळजी घेतली. परंतु भाजपाकडूनही ठाणे शहरातील पालिकांवर एकहाती वर्चस्व मिळवण्याचे प्रयत्न सुरू झाल्याने या भागातील उल्हासनगर, कल्याण डोंबिवली, बदलापूर, अंबरनाथ आदी भागात स्वबळाची भाषा सुरू झाली आहे. ठाणे महापालिकेतील न सुटलेले प्रश्न समोर आणून भाजपकडून शिंदेंच्या बालेकिल्ल्याला हादरे देण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. यात पाणीपुरवठा, अतिक्रमणे, रस्ते, आरोग्य, धोकादायक इमारतींचा प्रश्न समोर आणले जात आहेत. पालिकेच्या राजकारणातील मुद्देही तेच आहेत, होणारा विलंबही तसाच आहे, आरोपही तेच आहेत. निवडणुका या बदलाची नांदी असतात, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निमित्ताने असा बदल यंदाही अनुभवायला मिळायला हवा, मतदाराला ही आशा आहे.



## निकालानंतर ठरेल या शहरांचे भवितव्य

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालांचे परिणाम नगरपालिका व महानगरपालिकांच्या निकालांवर पडण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक या शहरांवर कोणत्या राजकीय पक्षाचा झेंडा फडकणार, हे नगर पंचायत व नगर परिषदांच्या निकालांनंतर स्पष्ट होईल.**

अखेर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजले. पहिल्या टप्प्यात नगर पंचायत व नगर परिषदेच्या निवडणुका पार पडणार आहेत. त्यानंतर नगरपालिका व महानगरपालिकेचे रणशिंग फुंकले जाणार आहे. सत्तेची सूत्रे कोणाच्या हातात द्यायची हा संपूर्ण अधिकार मतदार राजाचा. मात्र नगर पंचायत व नगर परिषदेच्या निकालाचा थेट परिणाम आगामी मुंबई महानगरपालिका, नगरपालिकेच्या निवडणुकांवर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबई, ठाणे, पुणे, नाशिकवर कोणत्या राजकीय पक्षाचा झेंडा फडकणार यासाठी नगर पंचायत व नगर परिषदेच्या निकालांकडे सगळ्याच राजकीय पक्षांचे लक्ष असेल.

महाराष्ट्रातील नगर पंचायत आणि नगर परिषदेच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. राज्यातील सर्वात महत्त्वाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुका आहेत. नगर पंचायत व नगर परिषदेच्या निकालानंतर पुढील महानगरपालिका निवडणुकांतील जनमताची दिशा ठरणार आहे. सत्ताधारी भाजप व शिंदेंची शिवसेना या निवडणुकांकडे प्रतिष्ठेची बाब म्हणून पाहत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ग्रामीण आणि अर्धशहरी भागात मजबूत पायाभूत रचना उभी करण्यासाठी व्यापक प्रचार मोहीम हाती घेतली आहे, तर त्यांच्या तुलनेत विरोधक उद्धव ठाकरे यांचे शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि काँग्रेस यांनी ह्यमहाविकास आघाडीह्न म्हणून स्थानिक स्तरावर जनसंपर्क वाढवण्यावर भर दिला आहे. परंतु नगर पंचायत व नगर परिषदेच्या निवडणुकांचे निकाल सत्ताधारी व महाविकास आघाडीसाठी जनमताचा प्राथमिक अंदाज देतील. जर भाजपह्नशिंदे गटाला या निवडणुकांमध्ये मोठे यश मिळाले, तर ते मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी निर्णायक मानसिक व राजकीय बळ देणारे ठरणार आहे. परंतु जर विरोधकांनी ग्रामीण व नगर भागात चांगली कामगिरी केली तर मुंबईसह इतर महानगरपालिकांमध्ये त्यांना प्रबळ आव्हान उभे करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे नगर पंचायत व नगर परिषदेच्या निवडणुका महायुती व मविआसाठी पुढील दिशा ठरवणा□या ठरणार आहेत.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला सत्ता स्थापनेचा बहुमान मिळाल्यानंतर महायुतीतील नेत्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. मात्र मुंबई महानगरपालिकेवर गेली २५ दशके ठाकरे सेनेचे वर्चस्व कायम राहिले आहे. मात्र शिंदे गटाच्या बंडानंतर ठाकरे सेनेचे ४५ हून अधिक माजी नगरसेवक शिंदे सेनेत गेले आहेत. त्यामुळे आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत शिंदे यांच्या शिवसेनेचे मतविभाजन ही निर्णायक बाब ठरू शकते, तर दुसरीकडे महाविकास आघाडी एकत्र राहिली तर त्यांना मुंबईत बहुमताची संधी आहे; पण जर अंतर्गत मतभेद वाढले, तर सत्ताधारी युतीला स्पष्ट फायदा होईल. परंतु नगर पंचायत आणि नगर परिषदेच्या निवडणुकांचे निकाल महाराष्ट्राच्या आगामी महानगरपालिका निवडणुकांचा राजकीय पाया ठरतील. या निकालानंतर जनमताचा कल स्पष्ट होईल आणि मुंबई महानगरपालिकेत कोणाला बहुमत मिळू शकते याचे आकलन अधिक ठोसपणे करणे शक्य होईल. त्यामुळे येणारे काही आठवडे महाराष्ट्राच्या राजकीय भवितव्यासाठी अत्यंत निर्णायक ठरणार आहेत.

मुंबई-ठाणे-पुणे-नाशिक अशा एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले आहेत. नगर पंचायत व नगर परिषदेच्या निवडणुका आधी पार पडणार असल्या तरी मुंबई महानगरपालिका निवडणूक ही महाराष्ट्रातील सर्वात प्रतिष्ठेची निवडणूक मानली जाते. भारतातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका असलेल्या मुंबई महापालिकेवर नियंत्रण मिळवणे ही सर्वच राजकीय पक्षांची इच्छा असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधक या दोन्ही बाजूंकडून ही निवडणूक अत्यंत गांभीयार्ने लढवली जाणार आहे. सध्या मुंबईतील राजकीय समीकरणे गुंतागुंतीची आहेत. भाजप, एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सत्तेत आहे. भाजप व शिंदे सेना दोन्ही पक्ष महानगरपालिकेत एकत्र लढण्याची शक्यता जास्त आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे मुंबई, ठाण्यात तितकेसे वर्चस्व नाही. त्यामुळे आगामी मुंबई महानगरपालिका, ठाणे, पुणे व नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीचा पेपर सोडवणे महायुतीसाठी सोपे असले तरी आव्हानात्मक ठरणार आहे, हेही तितकेच खरे.

मुंबईतील राजकीय समीकरणात मनसे आणि वंचित बहुजन आघाडीसारख्या लहान पक्षांचाही परिणाम काही प्रभागात-विभागात जाणवू शकतो. मनसेने स्वतंत्रपणे किंवा भाजपसोबत हातमिळवणी केली तर मराठी मतांचे विभाजन निश्चित आहे, तर मनसे आणि ठाकरे सेना एकत्रित निवडणुकीच्या रिंगणात उतरले, तर ठाकरे बंधूंना निवडणुकीत सहानुभूती मिळेल असे वाटत असले तरी ठाकरेंच्या शिवसेनेला मुंबई, ठाणेकर अधिक पसंती देतील. मात्र मुंबई महानगरपालिका निवडणुकीत कोणाला बहुमत मिळेल हे ठरवताना स्थानिक उमेदवारांची प्रतिमा, पक्षाचे संघटन आणि गठबंधनातील एकजूट निर्णायक ठरणार आहे. भाजप-शिंदे युतीसमोर सत्ता मिळवण्याचे आव्हान असणार आहे, तर महाविकास आघाडीला आपली एकता आणि जुनी पकड सिद्ध करावी लागणार आहे. एकूणच मुंबई महानगरपालिकेची ही निवडणूक महायुती व महाविकास आघाडीसाठी पुढील राजकीय दिशा ठरवणारी ठरणार आहे.

# वजन घटवण्यासाठी 'पीनट बटर' उपयुक्त

**सँडविचमध्ये** लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक 'स्प्रेड' म्हणून 'पीनट बटर' म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून, त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते. पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमिल घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर 'ॲडीटिव्ह' असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत. त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूडही यामध्ये घालता येऊ शकते.





# चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक

सुंदर, नितळ, गोरी त्वचा कोणाला नको असते. यासाठी लोक चेहऱ्यावर विविध प्रयोग करत असतात. मात्र कांदा आणि लसूणचा फेसपॅक तुम्ही कधी ट्राय केलाय का?



**त्वचा उजळण्यासाठी लसूण फायदेशीर** : लसूणमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, सेलेनियम, झिंक असते. त्वचेवरील मुरुमे हटवण्यासाठी लसूण फायदेशीर आहे. लसणाच्या पेस्टमध्ये मध मिसळून हा पॅक लावल्यास चेहऱ्यास फायदा होता. पिंपल्सच्या जागी लसूणचा रस लावा, पिंपल्स लवकर बरे होतील आणि डाग राहणार नाहीत.

**त्वचेसाठी वरदान आहे कांदा :** कांद्यामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. याशिवाय अँटीऑक्सिडंट्सही असतात. कांद्याच्या रसात अँटी सेप्टिक, अँटी-बॅक्टेरियल यासारखे गुण असतात. ज्यामुळे त्वचेवरील मुरुमे निघून जातात.

**कसा करावा वापर :** तुम्ही रोजच्या डाएटमध्ये कच्च्या कांद्याचा वापर करू शकता. कांदा त्वचेसाठी चांगला. याशिवाय तुम्ही कांदा किसून त्याचा फेसपॅक बनवून वापरू शकता. तसेच कांद्याच्या रसाचाही वापर करू शकता.

# घरगुती लिपस्टिक तयार करणे इतके सोपे

**बाजारात** मिळणारे कॉस्मेटिक महाग तर असतातच पण आपल्या स्कीनवर विपरित परिणाम करणारे असतात. त्यातून ओठ हे तर सर्वात नाजूक असतात, यावर रोज बाजारातील लिपस्टिक लावली तर ओठ काळे पडू लागतात. म्हणून येथे आम्ही सोपी पद्धत सांगत आहोत ज्याने आपण घरी लिपस्टिक तयार करू शकता.



**साहित्य :** एक बीट, १/२ कोकोनट ऑइल, १/२ चमचा मधमाश्यांचे मेण, १/२ चमचा कोको बटर

**कृती :** बिटाचे पातळ काप करून वाळू द्या. डिहायड्रेटरमध्ये हे काप १२० डिग्रीवर ८ तास ठेवून वाळवू शकता. नंतर मिक्सरमधून वाटून पावडर तयार करा. मंद आचेवर एका भांड्यात अर्धा ते १ कप पाणी टाकून त्यात मेण, कोकोबटर, कोकोनट ऑइल आणि बीट पावडर मिसळा. चांगले ढवळा. गडद रंगासाठी अधिक पावडर किंवा वाळलेल्या चेरीज वापरू शकता. घट्ट झाल्यावर मऊ कपड्याने गाळून घ्या. लिप कंटेनरमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. थंड होऊ द्या. आपले लिपस्टिक तयार झाले. हे पूर्णपणे नैसर्गिक असल्यामुळे ओठ काळे पडणार नाहीत.

# 'ब्लॅक टी'चे असेही फायदे

**ब्लॅक** टीमुळे शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. भारतात सर्वाधिक प्यायले जाणारे पेय म्हणून चहाचा पहिला क्रमांक लागतो. चहा, कॉफी म्हटले की अनेक जण दुधाचा चहा, कॉफीला पसंती देतात. दुधाच्या चहाच्या तुलनेत खूप कमी लोकांना ब्लॅक टी आवडते. तुलनेने ब्लॅक टी चवीला चांगली लागत नसली तरी तिचे अनेक फायदे आहेत. बाजारात अनेक प्रकारच्या ब्लॅक टी उपलब्ध आहेत. घरात बनवली जाणरी ब्लॅक टी लिंबू रस टाकून घेता येते. बाजारात इंग्लिश ब्रेकफास्ट टी, अर्ल ग्रे टी, आसाम टी, दार्जिलिंग टी, निलगिरी टी असे चहाचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत.



काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एक संशोधन करण्यात आले होते. या संशोधनाचा अहवाल युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये पब्लिश करण्यात आला होता. या अभ्यासानुसार ब्लॅक टीमध्ये विविध प्रकारचे विशेष तत्त्व असल्याचे सिद्ध झाले आहे. ब्लॅक टीमधील चहाचे विशेष तत्त्व पोटात जाऊन मोठा प्रभाव पाडतात. ब्लॅक टीमुळे वजन घटवण्यास मदत होते. तसंच शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. विषारी द्रव्ये शरीरातून बाहेर निघाल्यामुळे कोणताही आजार बळावण्याची शक्यता कमी होते.

टॉक्सिंस शरीरातून बाहेर पडल्यामुळे आरोग्यही उत्तम राहण्यास मदत होते.


चहात ॲण्टी ऑक्सिडेंट सर्वाधिक असतात. अनेक संशोधनांतून संशोधकांनी ब्लॅक टी आणि ग्रीन टीमध्ये प्रोबायोटिक्स तत्त्व आढळून येत असल्याचे सांगितले आहे. प्रोबायोटिक्स तत्त्व शरीरात प्रतिरोधक सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी मदत करतात. ब्लॅक टी वजन नियंत्रणात ठेवून अनेक आजारांपासून बचावही करते.



ब्लॅक टीमध्ये दूध आणि साखर नसल्याने शरीरात फॅट जमा होत नाही. चहातील ॲण्टीऑक्सिडेंट शरीरातील अतिरिक्त चरबी न वाढू देण्याचे काम करते. एका संशोधनातून दिवसांतून तीन वेळा ब्लॅक टी पिण्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहत असल्याचे समोर आले आहे. डोकेदुखी होत असल्यास ब्लॅक टीमध्ये लिंबू टाकून प्यायल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.

# इंटरनेटवरील नको त्या गोष्टींपासून मुलांना असे ठेवा दूर

**आजच्या** डिजिटल जगात, इंटरनेटचा वापर थोरा-मोठ्यापासून ते लहान मुलापर्यंत प्रत्येक व्यक्ती करतो. लहान मुलांना इंटरनेटवर सहसा ऑनलाइन व्हिडीओ किंवा त्यांच्या वयोगटाशी संबंधित कार्टून इत्यादी यूट्यूबवर पाहायला आवडते. मात्र इंटरनेटवर अनेक प्रकारचे कंटेंट उपलब्ध असतात. ज्यामुळे मुले भरकटू शकतात. असे होऊ नये याकरिता मुलांच्या इंटरनेट ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे आणि त्यासाठी सुरक्षित पद्धतींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. तुम्हालाही तुमच्या मुलांचा इंटरनेट वापर सुरक्षित ठेवायचा असेल तर, ही माहिती तुमच्यासाठी. यामध्ये आज आम्ही चुकीच्या कंटेंटपासून मुलांचे संरक्षण करण्याच्या काही सोप्या टिप्स सांगणार आहोत. जाणून घेऊया.



**पॅरेंट्स कंट्रोल्स वापरा :**

आजकाल गुगलसह यूट्यूब आणि इंस्टाग्रामसारख्या अनेक प्लॅटफॉर्मवर पेरेंट्स कंट्रोल सुविधादेखील उपलब्ध आहे. तुमची मुले नियमितपणे वापरत असलेले ॲप्स नियंत्रित करण्यासाठी तुम्ही याचा वापर करू शकता.

**मुलांना इंटरनेट सुरक्षिततेबद्दल शिकवा**

हे सर्वात महत्त्वाचे काम आहे. कारण मुलांच्या ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे सोपे काम नाही. अशात, मुलांना इंटरनेटवरील धोक्यांची माहिती देणे आणि त्यांना इंटरनेट वापरण्याच्या योग्य मार्गांची जाणीव करून देणे आवश्यक आहे. यासोबतच मुलांना ऑनलाइन पेमेंट आणि मालवेअरच्या धोक्यांबाबत आवश्यक माहिती दिली पाहिजे.

**स्वतंत्र ई-मेल आयडी तयार करा :**

तुम्ही मुलांसाठी वेगळा ई-मेल आयडी देखील तयार करू शकता, त्यामुळे वेब ब्राऊझिंग दरम्यान अनावश्यक जाहिराती टाळता येतील. यासोबतच तुमची मुलं कोणत्या प्रकारचा कंटेन्ट पाहत आहे याची अचूक माहितीही तुम्हाला मिळेल. त्याच वेळी, नवीन ई-मेल आयडीवरून ब्राऊझरच्या मदतीने तुम्ही असुरक्षित वेबसाइट आणि कुकीज बंद करू शकता.

# स्मरणशक्ती वाढवण्यासाठी 'हाकिनी योगमुद्रा' उपयुक्त

**नववर्षाचा** उल्लास आता सरला आहे आणि विद्यार्थी वर्गाला आता वेध लागले आहेत ते लवकरच येणार असलेल्या वार्षिक परीक्षांचे. सर्वसाधारणपणे मार्च ते एप्रिल महिन्यांच्या दरम्यान होणार असलेल्या या परीक्षांची तयारी, विद्यार्थी आतापासून करण्यास सुरुवात करीत असतात. पालकही या काळामध्ये मुलांच्या खाण्या-पिण्याची, त्याच्या तब्येतीची काळजी घेण्यामध्ये कोणतीही कसर बाकी ठेवत नाहीत. या काळामध्ये मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योग्य आहार, नियमित आणि पुरेशी झोप मुलांना मिळणे आवश्यक असते. यामुळे शारीरिक आणि मानसिक तणाव दूर होण्यास मदत होते. मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी, याकरिता योगसाधनेची मदतदेखील घेता येऊ शकेल. मेंदू सक्रिय राहून स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योगसाधनेमध्ये हाकिनी मुद्रा सांगितली गेली आहे.



एखाद्या गोष्टीचा विसर पडत असल्यास ही मुद्रा लावून त्या वस्तूचे स्मरण करण्याचा प्रयत्न केल्याने ती गोष्ट आठवण्याची शक्यता मोठी असते. विद्यार्थ्यांच्याखेरीज ज्यांना वारंवार काही ना काही गोष्टी विसरण्याची सवय असते, त्यांच्यासाठी देखील ही मुद्रा लाभदायी आहे. ही मुद्रा करण्यासाठी दोन्ही हातांच्या पाचही बोटांचे अग्रभाग जुळवावे. त्यानंतर डोळे वरच्या बाजूला फिरवून त्यांवर अगदी हलका ताण द्यावा. श्वास घेत आपली जीभ हिरड्यांना टेकवावी. त्यानंतर श्वास सोडत जीभ पूर्वस्थितीत आणावी. ही मुद्रा करताना श्वासोच्छ्वास दीर्घ असावा. विद्यार्थ्यांकरिता स्मरणशक्ती वाढवण्याच्या दृष्टीने ही मुद्रा अतिशय लाभदायक आहे.

**शारीरिक विकास आणि तंदुरुस्त राहणे यासाठी जीवनसत्त्वे, खनिजे यांची आवश्यकता असते. या घटकांची कमतरता असल्यास शरीराला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वही शरीरासाठी महत्त्वाचे असते. रोगांपासून बचाव करण्यासाठी ई जीवनसत्त्व गरजेचे असते. त्याची कमतरता भासल्यास केस, डोळे, त्वचा यांच्याशी निगडित अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वाची कमतरता भासल्यास शरीराकडून काही संकेत मिळतात. शरीराच्या या संकेतांकडे वेळीच लक्ष न दिल्यास अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेची कारणे, त्याची लक्षणे आणि कमतरता भरून काढण्यासाठी काय उपाय करावेत ते पाहूया.**

# 'ई' जीवनसत्त्वाची कमतरता

**कमी** चरबीयुक्त आहार घेतल्यास शरीराला 'ई' जीवनसत्त्वाची कमतरता भासते. ज्या लोकांना आतड्यांशी निगडित आजार आहेत. उदा, क्रोहन आणि पित्त (गॉलब्लाडर) या समस्या भेडसावत असतील त्यांच्यामध्ये ई जीवनसत्त्वाची कमतरता असते.



**लक्षणे :**

**स्नायू कमजोर होतात** : ई जीवनसत्त्वाची कमतरता असल्यास स्नायू कमजोर होतात. ई जीवनसत्त्व आणि सेलेनियमची कमतरता असल्यास मायोपॅथीची समस्या वाढते. मायोपॅथीमध्ये स्नायू सुकायला लागतात ते पसरू लागतात किंवा स्नायूंमध्ये वाकडेपणा येतो. ज्यामुळे शरीराचे अवयव वाकडे होऊ लागतात. चालण्या- फिरण्यात अडचणी निर्माण होतात. लहान मुले आणि ज्येष्ठ व्यक्ती यांना हा आजार होण्याचा धोका अधिक आहे. त्याव्यतिरिक्तही अनेक समस्या निर्माण होतात.

**दृष्टी कमी होणे :** ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे डोळ्यांचा रेटिना आणि डिजनरेशन पातळ होते. त्यामुळे डोळ्यातील आतल्या भागावर त्याचा परिणाम होतो. अनेकदा दृष्टी धुसर होते आणि रात्री काही न दिसण्याची समस्या म्हणजे रातआंधळेपणा येऊ शकतो.



**रक्ताची कमतरता :**

अनेकदा शरीरात रक्ताची कमतरता होऊ लागते. हल्ली रक्तपेशी कमी होणे यात नवल राहिलेले नाही. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळेही असे होऊ शकते. त्यामुळे शरीराला योग्य प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही आणि व्यक्ती अशक्त होऊ लागते.

**ई जीवनसत्त्वाची कमतरता कशी पूर्ण कराल?**

शाकाहारी लोकांना ई जीवनसत्त्वाची कमतरता पूर्ण करण्यासाठी भाज्या, हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा, रताळे, सलगम, मोहरी, आंबा, ब्रोकोली, गहू, बीन्स, अव्हाकॅडो इत्यादींचा समावेश आपल्या आहारात करावा.

# उन्हात जीन्स वापरताय, अशी घ्या काळजी...

उन्हात सगळ्यात सोयीस्कर म्हणून तुम्ही जीन्स घालत असाल, तर तुमच्यासाठी एक महत्त्वाची बातमी आहे. उन्हात बाहेर निघालं की शरीराची अक्षरशः लाही-लाही होण्यास सुरुवात झाली आहे. अशात जर तुम्ही घट्ट जीन्स वापरत असाल, तर जीन्स वापरताना नक्की काळजी घ्या. उन्हात घराबाहेर पडताना जीन्स-टॉप किंवा टी शर्ट आणि गॉगल लावला असा रफटफ पेहराव तुम्ही करत असाल. तर तुमच्यासाठी थोडं महत्त्वाचं...



**जीन्स** अतिशय घट्ट असेल तर जंतुसंसर्ग होण्याचा धोका असतो. घट्ट जीन्स वापरल्यामुळे त्वचेची जळजळ, त्वचा काळवंडणं, घामोळ्या येणं, खाज सुटणं, काळे चट्टे येणं असे त्रास होऊ शकतात. गेल्या काही दिवसांत घट्ट जीन्समुळे जंतुसंसर्ग झाल्याचं प्रमाण वाढलंय. विशेष म्हणजे खाज कमी करण्यासाठी स्टेरॉईडयुक्त मलम लावलं जातं. त्यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता असते. उन्हाळा असल्यास पातळ, सुती कपडे घालणे योग्य आहे. त्यामुळे शरीरीतील घाम शोषूण घेण्यास मदत होते. जाड कपड्यांचा पेहराव शक्यतो करू नये. त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही क्रीम वापरू नये, असा सल्ला डॉ. उदय कोपकर, त्वचारोगतज्ज्ञ यांनी दिला आहे.

उन्हाळ्यात प्रामुख्याने अतिनील किरणांमुळे डोळ्यांना त्रास होतो. गॉगल बी २ इतका काळा असणं गरजेचं आहे. यूव्ही-रेजपासून संरक्षण करणाऱ्या कॉण्टॅक्ट लेन्ससुद्धा उपलब्ध आहेत.

यंदाच्या उन्हाळ्यात तुमच्या शरीराची काळजी नक्की घ्या.



# ॲसिडिटीवर करा घरगुती उपचार

**अनेक** जणांना ॲसिडिटीचा मोठा त्रास होतो. डोकं दुखणं, मानदुखी, छातीत जळजळ होणे, उलट्या होणे, अर्धशिशी, अस्वस्थ होणे अशा प्रकारचा त्रास होतो. झोप पूर्ण न होणं, जागरण, उपाशी राहाणं, चुकीची जीवनशैली, अवेळी खाणे, झोपेच्या सतत बदलत्या वेळा यामुळे त्रास होत असतो. ॲसिडिटीचा त्रास कमी करण्यासाठी अनेक जण गोळ्या घेतात. परंतु अशा गोळ्यांमुळे काही वेळ बरं वाटतं, परंतु पुन्हा त्याचा त्रास सुरू होतो. सतत गोळ्या घेतल्याने त्याचा शरीरावरही घातक परिणाम होत असतो. परंतु ॲसिडिटीवर घरगुती उपयांनीही काही वेळात आराम मिळू शकतो.

▮ सतत ॲसिडिटीचा त्रास होत असणाऱ्यांनी थंड दूध प्यायल्याने पोटात आणि छातीत होणारी जळजळ कमी होते.

▮ आल्याचा तुकडा चावून खाल्ल्यानंतर त्यावर गरम पाणी प्यायल्याने फायदा होतो.

▮ केळे ॲसिडिटीवर अतिशय नैसर्गिक उपाय आहे. ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास नियमित केळे खाल्ल्याने फायदा होतो.

▮ बडिशेप ॲसिडिटी कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. जेवणानंतर बडिशेप खाल्ल्याने ॲसिडिटीचा त्रास होत नाही. बडिशेप चावून किंवा चहा करूनही पिऊ शकतात.

▮ आवळा सी विटॅमिनयुक्त असतो. आवळा पोटदुखी, गॅस, ॲसिडिटीमध्ये आराम देतो. आवळा पित्त कमी करत असून केसांचं आणि त्वचेचंही आरोग्य राखतो.

▮ टोमॅटोमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि विटॅमिन सी असतं. जे शरीरातील जीवाणूंना बाहेर काढतं. टोमॅटो आंबट असलं तरी शरीरात क्षारांचे प्रमाण वाढवतं. टोमॅटोच्या नियमित सेवनाने ॲसिडिटीची समस्या कमी होते.

▮ मसाल्यांमधील ओवा अतिशय गुणकारी आहे. ॲसिडिटीवरही ओवा फायदेशीर आहे. ॲसिडिटीचा झाल्यास ओवा आणि जिरं एकत्र भाजून घ्या. हे मिश्रण पाण्यात टाकून थोडी साखर टाकून प्यायल्याने फायदा होतो.

▮ गुळात मॅग्नेशियम असतं. मॅग्नेशियम आतड्यांना मजबूत करण्याचं काम करतं. त्यामुळे पचनक्रिया सुरळीत होते. रोज जेवणानंतर गुळ खाल्ल्याने पित्त, ॲसिडिटीचा त्रास कमी होतो.

▮ वेलची खाल्ल्याने ॲसिडिटीची समस्या दूर होते. एक ग्लास पाण्यात २ वेलची उकळून पाणी थंड करून प्या. त्यामुळे ॲसिडिटीचा त्रास दूर होतो.

▮ तुळशीची पानंही पित्ताच्या, ॲसिडिटीच्या त्रासावर गुणकारी आहेत. पित्ताचा, ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास तुळशीची काही पानं चावून खा किंवा पानं पाण्यात उकळवून ते पाणी पिण्यानेही फायदा होतो. नियमित तुळशीची पानं खाल्याने पित्ताचा त्रास कायमचा बरा होतो.



# केळी खाण्याचे असेही फायदे



**फळांमधील केळे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी ठरते. केळ्यात पोटॅशियम आणि विटॅमिन भरपूर प्रमाणात असतात. त्याशिवाय केळ्यात इतरही अनेक पोषक तत्त्व असतात, जी शरीरासाठी अतिशय गुणकारी असतात. त्यामुळेच कोणत्याही प्रकारचं केळे आपल्या खाण्यात सामील केल्याने फायदे होतात. दररोज केळे खाल्ल्याने हार्ट ॲटॅकची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होते. त्याशिवाय केळ्याचे इतरही अनेक फायदे आहेत. आज वर्ल्ड बनाना डे आहे. या विशेष दिवशी जाणून घ्या अति पिकलेल्या केळ्याचे जबरदस्त फायदे.**

**केळ्याचा** रंग जसजसा काळा पडत जातो, ते अधिक, अति पिकलं जातं असं केळं अनेक जण खराब झालं म्हणून किंवा काळं आणि अतिशय मऊ झालं म्हणून खायला आवडतं नसल्याचं सांगतात. परंतु अति पिकलेलं, मऊ, काळं झालेलं केळं शरीरासाठी अतिशय गुणकारी असतं. या केळ्याच्या दररोज खाण्याने अनेक आजारांपासून दूर राहण्यास मदत होते.

रंगाच्या आधारे केळं पिकलेलं आहे किंवा कच्चं आहे याचा अंदाज लावता येतो. केळ्याचा रंग जर हिरवा असेल तर ते कच्चं केळं म्हणून ओळखलं जातं. अशा केळ्याचा वापर भाजीसाठी केला जातो. त्यानंतर केळ्याचा रंग पिवळा होत जातो. केळं अधिक पिकत गेलं की त्यावर काळे डाग पडायला सुरुवात होते. त्यानंतरही काही दिवसांत केळ्याचं संपूर्ण सालचं काळं पडत. युनायटेड नेशनमधील 'इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट' या संस्थेने अति पिकून संपूर्ण साल काळं पडलेल्या केळ्याचे महत्त्व, त्याचे फायदे सांगितले आहेत. अशा केळ्यात ट्रिप्टोफॅन मोठ्या प्रमाणात असतं. त्यामुळे मानसिक ताण, चिंता (Anxiety) कमी होण्यास मदत होते. तसेच या मोठ्या प्रमाणात पोषकद्रव्ये असतात. त्यामुळे अशा केळ्याचा वापर ब्रेड बनवण्यासाठी तसेच मिल्कशेक बनवण्यासाठी केला जाऊ शकतो.

हिरवी साल असलेलं केळं खात असाल तर त्यामुळे रक्तातील साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. हे केळं अगदी हळूहळू पचतं. त्यामुळे ब्लड ग्लुकोज कमी प्रमाणात निर्माण होतं. पिकलेलं केळं ॲण्टी-ऑक्सिडेंट म्हणून मानलं जातं. हे केळं मेटबॉलिज्म अर्थात चयापचन क्रियेला मजबूत करण्यात मदत करते. त्यामुळे अनेक आजार होण्याची शक्यता अतिशय कमी होते. हे केळं अगदी सहजतेने पचतं. त्यामुळे अति पिकलेल्या केळ्याचा वापर नाश्त्यामध्ये करणे अतिशय आरोग्यदायी मानले जाते. डॉक्टरांकडूनही सकाळच्या नाश्त्यात केळं खाणं गुणकारी मानले जाते.

केळे बाराही महिने बाजारात मिळणारे फळ आहे. केळ्याचा वापर सौंदर्यासाठीही केला जातो. केळं शक्तिवर्धक आहे. दररोज केळी खाणाऱ्या व्यक्तीला एनिमियाचा धोका नसतो. केळं खाल्याने मूडही चांगला राहतो. थकवा दूर होतो. केळ्यातील प्रोबायोटिक बॅक्टेरिया खाण्यातील कॅल्शियम शोषून घेते. यामुळे हाडेही मजबूत होतात.

# रुग्णालये आणि आरोग्य संस्थांमध्ये ‘स्वच्छता पंधरवडा’

## सर्व संस्थांचे होणार मूल्यांकन आणि श्रेणीकरण

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

आरोग्य सेवेची गुणवत्ता वाढवण्यासाठी महापालिकेची सर्व रुग्णालये व आरोग्य संस्थांमध्ये ६ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २०२५ दरम्यान स्वच्छता पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. तसेच संपूर्ण मोहिमेनंतर सर्व संस्थांचे मूल्यांकन व श्रेणीकरण करण्यात येणार आहे. याशिवाय स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, नवकल्पना आणि सार्वजनिक सहभाग या निकषांवर आधारित मूल्यांकनानुसार उत्कृष्ट कामगिरी करणारय़ा रुग्णालयांना गौरवपत्र / प्रशस्तिपत्र देण्यात येणार आहे.

मुंबई महापालिकेच्या रूग्णालयात वैद्यकीय उपचारांसाठी येणाऱ्या रुग्ण आणि रुग्णांच्या नातेवाईकांना आरोग्य सेवांच्या अनुषंगाने अधिक गुणवत्तापूर्ण अनुभव मिळावा, यासाठी मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत ६ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २०२५ याकालावधी दरम्यान सर्व रुग्णालये व आरोग्य संस्थांमध्ये ‘स्वच्छता पंधरवडा’ राबविण्यात येणार आहे. आरोग्य सेवेतील सुधारणा, कर्मचारी सहभाग आणि रुग्ण संतोष वाढविण्यासाठी ही स्वच्छता मोहीम महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

मुंबई महापालिकेच्या आरोग्य सेवेचा दर्जा उंचवण्याच्या अनुषंगाने एकत्रितपणे ही मोहीम राबवण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा यांनी दिल्या आहेत. स्वच्छता मोहिमेच्या यशासाठी महापालिकेच्या आरोग्य क्षेत्रातील सर्व रुग्णालये / संस्था, विभागातील विद्यमान मनुष्यबळ आणि उपलब्ध संसाधनांचा अधिकाधिक उपयोग करून मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) शरद उघडे यांनी केले आहे.

मुंबई महापालिकेच्या आरोग्य सेवांशी संबंधित विश्वासाला बळकटीकरण मिळावे याद्दष्टीने रुग्णालयातील स्वच्छता, निजंर्तुकीकरण आणि सुंदर वातावरण राखण्याचे निर्देश मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत. त्या द्दष्टीने आयोजित या स्वच्छता पंधरवड्याचा उद्देश हा आरोग्य संस्थांमधील स्वच्छता पातळी उंचावणे, कचरा व्यवस्थापन सुधारणा करणे, संक्रमण नियंत्रणावर भर देणे तसेच कर्मचारी, रुग्ण आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे, हा आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत ६ ते २० नोव्हेंबर २०२५ याकालावधीत रुग्णालय कार्यालय, वसतिगृहे, चौक्या, उपहारगृहे, भांडारकक्ष (स्टोअर), रुग्णालय अंतर्गत पदपथ इत्यादी याठिकाणी संपूर्ण स्वच्छता मोहीम राबविण्यात येईल. त्यासोबतच निजंर्तुकीकरण, कचरा वर्गीकरण, कचऱ्याची विल्हेवाट व्यवस्था, शून्य राडारोडा, भंगार यावर लक्ष केंद्रीत करुन कार्यवाही केली जाईल. रुग्णालयातील उपलब्ध यंत्रणा, कर्मचारी यांच्यामार्फत संयुक्त मोहीम राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित सहाय्यक आयुक्त, विभागातील घनकचरा व्यवस्थापन विभाग, परिरक्षण विभाग, कीटकनियंत्रण विभाग, अतिक्रमण निर्मूलन विभाग, उद्यान विभाग इत्यादींची मदत घेण्यात येणार आहे. मुंबई महापालिका रुग्णालयांचे अधीक्षक, वैद्यकीय अधिष्ठाता व वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

**मोहिमेच्या कालावधीत रुग्ण, नातेवाईक व कर्मचारी यांच्यासाठी स्वच्छता जनजागृती उपक्रम, स्वच्छता शपथविधी, कर्मचारी सहभाग कार्यक्रम आणि रुग्ण जागरूकता मोहीम आयोजित करण्यात येणार आहेत. या उपक्रमात स्थानिक सेवाभावी संस्था यांचीही मदत घेण्यात येणार आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने रुग्णालय आणि दवाखाने प्रत्येक आठवड्याचा प्रगती अहवाल आणि उपक्रमातील कृतींचे दस्तावेजीकरण करण्यात येईल. संपूर्ण मोहिमेनंतर सर्व संस्थांचे मूल्यांकन आणि श्रेणीकरण करण्यात येईल. स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, नवकल्पना आणि सार्वजनिक सहभाग या निकषांवर आधारित मूल्यांकनानुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या रुग्णालयांना प्रशस्तिपत्र/गौरवपत्र देण्यात येईल.**



### पर्यावरण, वातावरणीय बदल विभागात ४२ अभियंत्यांच्या जागा रिक्त

# गेल्या दीड वर्षापासून अभियंत्यांची वानवा

■मुंबई । प्रतिनिधी,

मुंबई महापालिकेच्या पर्यावरण, वातावरणीय बदल विभागात गेल्या दीड वर्षांपासून अभियंत्यांची वानवा आहे. या विभागातील विविध खात्यामध्ये सुमारे ४२ अभियंत्यांची पदे रिक्त असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामुळे आता महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी काय भूमिका घेतात, याकडे पर्यावरण, वातावरणीय बदल विभागातील अभियंत्यांचे लक्ष लागले आहे.

**या संवर्गातील रिक्त पदे -**
- उपप्रमुख अभियंता - २
- कार्यकारी अभियंता - २
- सहाय्यक अभियंता - ५
- दुय्यम अभियंता - ३३
- एकूण - ४२

मुंबई शहरांतील वाढते वायूप्रदूषण, विकासकामे यावर उपाययोजनांसह नियंत्रण व कारवाईसाठी अस्तित्वात असलेल्या मुंबई महापालिकेच्या पर्यावरण, वातावरणीय बदल विभाग मुंबई महापालिकेत ऑक्टोबर-२०२४ मध्ये कार्यान्वित करण्यात आला. मात्र हा विभाग सुरू करण्यापूर्वी संपूर्ण मनुष्यबळ घेण्यात आले नाही. सद्यस्थितीत सदर विभागात उपप्रमुख अभियंता-२, कार्यकारी अभियंता - २, सहाय्यक अभियंता - ५, दुय्यम अभियंता - ३३ अशी एकूण ४२ अभियंता संवर्गातील पदे रिक्त आहेत. ते भरण्याकडे नगर अभियंता विभागाचे दुर्लक्ष असल्याचा खुलासा पर्यावरण, वातावरणीय विभागातील एका अधिकाऱ्याने केला.

पर्यावरण, वातावरणीय बदल विभागाकडून गेल्या जुलै २०२४ पासून मुंबईतील पाव-बेकऱ्या, तंदुर भट्ट्या यांच्यामुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी त्यांना सीएनजी गॅसवर करण्याचे न्यायालयाने पालिकेला आदेश दिलेले आहेत. तसेच सिमेंट कॉंक्रीट प्लांट, निर्माणधीन इमारतीच्या बांधकामस्थळी विकासकाने धूळ प्रदूषण नियंत्रित मशीन लावणे, अशा विविध कामांसाठी अभियंता वर्गाची कमतरता भासत असल्याने या कामांना ब्रेक लागत आहे.

# मुंबईत ९० हजार भटके कुत्रे, निवारा केंद्रे केवळ ८ : बृहन्मुंबई महानगरपालिका

■मुंबई । प्रतिनिधी,

गेल्या काही दिवसांपासून भटक्या कुत्र्यांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सुप्रीम कोटार्ने भटक्या कुत्र्यांना निवारा केंद्रांमध्ये (शेल्टर होम्स) पाठवण्याचे आदेश दिल्यानंतर त्यावर आता मुंबई महानगरपालिकेकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. मुंबईत ९० हजारांपेक्षा जास्त भटके कुत्रे आहेत, परंतु त्यांच्यासाठी निवारा केंद्रांची संख्या फक्त आठ आहे, असे शनिवारी महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने योग्य नसबंदी आणि लसीकरणानंतर भटक्या कुत्र्यांना नियुक्त केलेल्या निवारा केंद्रांमध्ये स्थलांतरित करण्याचे निर्देश दिल्यानंतर मुंबई महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ‘‘सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी, महानगरात अधिक श्वान निवारागृहे उभारण्याची आवश्यकता आहे.’’

‘‘शैक्षणिक संस्था, रुग्णालये आणि रेल्वे स्थानक यांसारख्या वर्दळीच्या क्षेत्रांमध्ये कुत्र्यांनी नागरिकांचे लचके तोडल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. आता या घटनांमध्ये वाढ झाली असून ती चिंताजनक असल्याचे म्हणत, सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी योग्य नसबंदी आणि लसीकरणानंतर भटक्या कुत्र्यांना त्वरित नियुक्त केलेल्या निवारा केंद्रांमध्ये स्थलांतरित करण्याचे निर्देश दिले.’’

वर्दळीच्या क्षेत्रांमध्ये तसेच रस्त्यांवर कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांची पुनरावृत्ती केवळ प्रशासकीय उदासीनता नव्हे तर या परिसरांना प्रतिबंधित धोक्यांपासून सुरक्षित करण्यात पद्धतशीर अपयशदेखील दर्शवते, असेही निरीक्षण सुप्रीम कोर्टाने नोंदवले होते.

११ वर्षांपूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेल्या जनगणनेनुसार, मुंबईत किमान ९५,७५२ भटके कुत्रे होते, परंतु २०१४ पासून हाती घेतलेल्या पशु जन्म नियंत्रणाच्या (एबीसी) प्रभावी कार्यक्रमामुळे ही संख्या आता सुमारे ५,००० ने कमी झाली आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. सध्या, शहरातील भटक्या कुत्र्यांची संख्या ९०,६०० आहे, असे त्यांनी सांगितले.

सध्या, मुंबईत फक्त आठ श्वान निवारागृहे आहेत आणि या शेल्टर होम्समधील क्षमता फारच कमी आहे, कारण अधिकारी जुन्या आदेशानुसार नसबंदीनंतर भटक्या कुत्र्यांना सोडून देत आहेत, असेही त्यांनी सांगितले. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या अंमलबजावणीसाठी, मुंबईला प्रथम सार्वजनिक ठिकाणांहून भटक्या कुत्र्यांना काढून टाकण्याची आणि त्यांना श्वान निवारा केंद्रात हलवण्याची क्षमता वाढवावी लागेल. या निवारा केंद्रांमध्ये भटक्या कुत्र्यांना उर्वरित आयुष्यासाठी ठेवावे लागेल, असेही पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

‘‘सुप्रीम कोर्टाच्या निदेर्शानुसार, कुत्र्यांना शेल्टर होम्समध्ये हलवण्यापूर्वी प्रथम त्यांचे निजंर्तुकीकरण करावे लागेल, जिथे त्यांना त्यांच्या अन्न आणि पाण्याची व्यवस्था करण्याव्यतिरिक्त कुत्र्यांचे हाताळणी करणारे आणि पशुवैद्य नियुक्त करावे लागतील. कुत्र्यांच्या आश्रयस्थानांना योग्यरित्या कुंपण घालणे आवश्यक आहे. जेणेकरून कोणतेही कुत्रे पळून जाऊ शकणार नाहीत किंवा बाहेरील कुत्रे आत येऊ शकणार नाहीत. मुंबईतील ३० ते ४० टक्के भटक्या कुत्र्यांना शिक्षण संस्था, रेल्वे स्थानके, क्रीडा संकुल आणि इतर सार्वजनिक ठिकाणांमधून पकडून घेतले तर त्यांच्यासाठी निवारागृहांची आवश्यकता असेल,’’ असेही या अधिकाऱ्याने सांगितले.

‘‘कुत्र्यांची एक जोडी वर्षाला सुमारे २० पिल्लांना जन्म देते. कुत्र्यांच्या वाढीचा दर खूपच जलद असल्याने, त्यांची संख्या नियंत्रित ठेवण्यासाठी प्रभावी नसबंदी आवश्यक आहे. म्हणूनच, मुंबई महापालिका १९८४ पासून कुत्र्यांचा जन्म नियंत्रण कार्यक्रम राबवत आहे,’’ असे ते म्हणाले.



**७० टक्के कुत्र्यांचे दरवर्षी लसीकरण आवश्यक**

**पशु जन्म नियंत्रण (एबीसी) नियमांनुसार, कुत्र्यांपासून कुत्र्यांमध्ये रेबीजचा प्रसार टाळण्यासाठी एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के कुत्र्यांना दरवर्षी लसीकरण करणे आवश्यक आहे. त्याचे सध्या प्रभावीपणे पालन केले जात आहे. त्याचबरोबर सर्व कुत्र्यांना पकडून निवारा केंद्रांमध्ये पाठवले तरी त्यावर तात्पुरता तोडगा निघू शकतो. मात्र कालांतराने ही समस्या आणखी बिकट होऊ शकते, असा इशारा एका प्राणीमित्र संघटनेच्या अधिकाऱ्याने दिला आहे.**

### भटक्या कुत्र्यांची दहशत

# उपचारापेक्षा वेदना भयंकर

■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे शहरातील दिवा परिसरात भटक्या कुत्र्याने मागून केलेल्या हल्ल्यात दोन वर्षांची बालिका गंभीर जखमी झाली आहे. या घटनेमुळे दिव्यातील रहिवासी तीव्र भीतीच्या छायेत आहेत. दिवा उपनगरात घडलेली ही घटना ठाण्यातील इतर भागातही घडण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. झोपडपट्टी असो किंवा आलिशान गृहसंकुल, भटक्या कुत्र्यांचा वावर दोन्ही ठिकाणी वाढल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

मागील काही दिवसांचा आढावा घेतला असता, लहान मुलांवर भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांची संख्या वाढत असल्याचे आढळून येते. दिव्यातील घटनेपूर्वी टिटवाळा परिसरातही एका बालिकेला भटक्या कुत्र्याने लक्ष्य केले होते. विशेष म्हणजे, हे हल्ले दिवसा किंवा रात्री केव्हाही होत असून, अचानक चार ते पाच कुत्रे एकत्र येऊन झुंडीने हल्ला करतात. दुचाकी-चारचाकींच्या मागे लागणे, अंगावर धावून येणे, चावा घेणे अशा घटनांत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

मागील वर्षी रेबीजचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेत ७,४०९ भटक्या कुत्र्यांना लसीकरण करण्यात आले होते. रस्त्यावर उघड्यावर विकले जाणारे खाद्यपदार्थ, चायनीज स्टॉल, हॉटेल्स आणि धाब्यांमध्ये रात्री उरणारे अन्न पदार्थ रस्त्यावर टाकले जातात. या उघड्यावर टाकण्यात येणाऱ्या खाद्य अवशेषांमुळे भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. सार्वजनिक ठिकाणी मुक्त संचार करणाऱ्या भटक्या कुत्र्यांबाबत सर्वोच्च न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. सार्वजनिक ठिकाणांहून भटके कुत्रे हटवून त्यांचे निर्बीजकरण व लसीकरण करून त्यांना प्राणी निवारा गृहातच ठेवावे, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. मात्र तात्काळ अंमलबजावणी करणे अनेक शहरांसाठी आव्हानात्मक आहे, कारण पर्याप्त प्राणी निवारागृहे उपलब्ध नाहीत. रात्रीच्या वेळी शहरात अनेक ठिकाणी नागरिक कुत्र्यांना अन्न देत असतात; परंतु त्यांच्यामध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी कायद्याचा आधार घेणेही आवश्यक ठरेल. न्यायालयाने स्पष्ट आदेश दिले असले तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणार का, हा एक गंभीर प्रश्न आहे.



**उत्पत्तीवर नियंत्रण मिळवणे अत्यावश्यक**

ठाणे शहरात वागळे इस्टेट येथे महापालिकेचे भटक्या कुत्र्यांसाठी एकमेव निवारा केंद्र आहे. भटक्या कुत्र्यांची संख्या वेगाने वाढत असल्याने अतिरिक्त निवारा केंद्रांची तातडीची आवश्यकता आहे. त्याचबरोबर पशुवैद्य आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचीही मोठ्या प्रमाणात गरज निर्माण होणार आहे. भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण मिळवायचे असेल तर त्यांच्या उत्पत्तीवर नियंत्रण मिळवणे अत्यावश्यक आहे. निबीर्जीकरणाचा वेग वाढवून जन्मदर कमी करणे, तसेच नागरिकांमध्ये अन्नदान करताना घ्यावयाच्या काळजीबद्दल योग्य जनजागृती करणे गरजेचे आहे.

# बँकेत काम करणाऱ्या ३० वर्षीय विवाहित महिलेचा फोटो व्हायरल...

## संभाजीनगरात अध्यक्षानेच केलं धक्कादायक कृत्य

■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,

३० वर्षीय महिला पतीपासून विभक्त राहते. स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी नोकरी शोधत असताना अर्बन बँकेच्या अध्यक्षांसोबत ओळख झाली. ओळखीतून अध्यक्षांनी महिलेला नोकरी दिली. त्यानंतर तिच्या नावावर कार घेतली. यातून दोघांमध्ये वाद झाला. त्यानंतर आरोपीने महिलेचा फोटो अनोळखी व्यक्तीच्या फोटोशी जोडून सोशल मीडियावर अपलोड करत बदनामी केली. ही घटना २२ ऑक्टोबर रोजी एन 4 येथे घडली. या प्रकरणी पुंडलिक नगर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३० वर्षीय संजना यांचा पतीसोबत वाद झाल्याने त्या पतीपासून विभक्त राहतात. संजना स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी नोकरीच्या शोधात बाहेर पडल्या. यावेळी शिवराज जनसेवा अर्बन निधीचे अध्यक्ष शंकर अंबादास गोंडे याच्यासोबत ओळख झाली. गोंडे याने महिलेला दहा हजार रुपये पगाराने बँकेत नोकरी दिली. यातून महिलेची ओळख वाढवली. त्यानंतर महिलेच्या नावावर एम.एच. २० जी.के. ३०२६ क्रमांकाची कार विकत घेतली. त्यानंतर पैशावरून पीडित संजना व गोंडे यांच्यामध्ये वाद झाला. या कारणाने संजना यांनी बँकेतली नोकरी सोडून दिली. मात्र तरीही आरोपी गोंडे याने महिलेला त्रास द्यायला सुरुवात केली.

ठाणे२२ ऑक्टोबर रोजी शंकर गोंडे यांनी पीडित महिलेसोबतचा फोटो स्टेटसवर ठेवला. त्यानंतर बनावट इंस्टाग्राम अकाउंटवर पीडितेचा एका अनोळखी व्यक्तीच्या फोटो जोडून अपलोड केला. त्या फोटोखाली हा माझा तिसरा यार शेख अहमद कसा आहे, कमेंट करा, असा मजकूर लिहिला. एवढेच नाही तर पीडित महिलेला मी तुझी अशीच बदनामी करेन, तुला जगू देणार नाही अशी धमकी देखील दिली.

दरम्यान, या संपूर्ण प्रकाराला कंटाळून पीडित महिलेने पुंडलिक नगर पोलीस ठाणे गाठत याप्रकरणी दिलेल्या तक्रारीनंतर संशयिताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

### फेसबुकवर इन्स्पेक्टर चुलबुल पांडे बनून महिलांना जाळ्यात ओढायचा

# पुण्यात अत्याचारी बनावट पोलिसाच्या मुसक्या आवळल्या

■पुणे। प्रतिनिधी,

फेसबुक, इंस्टाग्राम सध्या खूप लोकप्रिय सोशल मीडिया बनले आहेत. पण याच ठिकाणी अनेक गुन्हेही घडत असतात. अनेक सायबर गुन्हेगारांचा सुळसुळाट आता ऑनलाईन जगतात निर्माण झाला आहे. अशाच स्वरुपाचा काहीसा प्रकार आता समोर आला आहे. सोशल मीडिया ॲप्स फेसबुक आणि इंस्टाग्रामच्या लोकप्रिय सामाजिक मंचांचा वापर करून महिलांच्या भावनांशी खेळत त्यांना फसवणूक करणारा एक प्रगल्भ गुन्हेगार अखेर पोलिसांच्या जाळ्यात पकडला गेला आहे. या आरोपीला भिगवण पोलिसांनी संगणकीय विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या साहाय्याने अकलूज परिसरातून अटक केली आहे.




आरोपीचे संपूर्ण नाव गणेश शिवाजी कारंडे आहे पण तो गुन्हे करताना कधी, तो फेसबुकवर ‘संग्राम पाटील’ तर कधी ‘पृथ्वीराज पाटील’ या नावाने वावरत असे. बनावट नावांनी प्रोफाइल तयार करून स्वतःला पोलिस अधिकारी असल्याचे सांगत असे. या प्रकारातून त्याची योजना असायची की महिलांचा विश्वास संपादन करणे, व त्यानंतर या महिलांकडून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लुबाडायची.

यामध्ये एका महिला जी व्यावसायिक आहे, ती या बनावट अधिकाऱ्यावर विश्वास ठेऊन फसली. व्यावसायामध्ये आपल्याला याची काही मदत होईल अशी अपेक्षा ठेऊन महिलेने गणेशवर विश्वास ठेवला होता, पण गणेशने तिच्याकडून दागिने आणि पैसे घेऊन महिलेबरोबर जबरदस्तीचे शारीरिक संबंध ठेवले असा गंभीर गुन्हा गणेशवर नोंदवण्यात आला आहे. त्यामुळे या बनावट पोलिसाच्या गुन्ह्याची गंभीरता लोकांना संताप आणून देणारी ठरते आहे

भिगवण पोलिसांच्या विशेष पथकाने या आरोपीकडून सुमारे तीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळवले असून, आरोपीवर यापूर्वी अकलूज, मंगळवेढा, पंढरपूर आणि लोणंद या ठाण्यांमध्ये महिलांवरील अत्याचार तसेच फसवणुकीचे अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

यामुळे या घटनांचा गंभीरतेने विचार करण्यात आलेला आहे आणि आरोपीच्या वर्तनावर कटाक्ष टाकण्यात आला आहे. ही कारवाई भिगवण पोलिस ठाण्याच्या पथकाने शुद्ध नियोजनाने आणि सजगतेने केली आहे.

# २७ वर्षीय डॉक्टर विवाहितेला भेटायला बोलावलं, संभाजीनगरात ३८ वर्षीय आरोपीकडून अत्याचार



■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,

२७ वर्षीय विवाहित डॉक्टर महिलेवर हॉटेलमध्ये अत्याचार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तेलंगणातील तरुणासोबत महिलेची ओळख झाली होती. त्यानंतर आरोपी तरुणाने तिला हॉटेलवर बोलवत तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. इतक्यावरच न थांबता आरोपी थेट डॉक्टर महिलेच्या घरापर्यंत गेला. त्यामुळे घाबरलेल्या महिलेने संपूर्ण प्रकार पतीला सांगितला. या प्रकरणी डॉक्टर महिलेच्या फियार्दीवरुन आरोपी विरुद्ध वेदांत नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला तेलंगणातून बेड्या ठोकल्या आहेत.

**काय आहे प्रकरण?**

सी. अमरनाथ, वय ३८ वर्ष, रा. मिरियालगुडा नालगोंडा तेलंगणा असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी पीडित महिलेने दिलेल्या फियार्दीनुसार, काही वर्षांपूर्वी तिची इन्स्टाग्रामवरुन आरोपी सी अमरनाथ याच्यासोबत ओळख झाली होती. आरोपीने डॉक्टर महिलेचा विश्वास संपादित करुन तिला १७ जुलै २०२४ रोजी पहिल्यांदा शहरात भेटायला बोलावले.

सिडको परिसरात एका हॉटेलमध्ये चहा नाश्ता करून तो माघारी परतला. त्यानंतर पुन्हा २३ ऑगस्ट २०२४ रोजी आरोपी सी अमरनाथ हा पुन्हा शहरात आला. तेव्हा त्याने महिलेला रेल्वे स्टेशन परिसरात भेटायला बोलावले. पाऊस सुरू असल्याने दोघं हॉटेल गेले. यावेळी आरोपीने मला पैशांची गरज आहे, तुज्या नावाने कर्ज काढून दे, काढलेले कर्ज मी स्वतः फेडेन असं सांगितलं. याचवेळी आरोपीने डॉक्टर महिलेवर हॉटेलमध्ये अत्याचार केला. अत्याचार करतानाचे फोटो व्हिडिओ देखील काढले. त्यानंतर ते फोटो तिला पाठवण्याची धमकी देत पुन्हा अत्याचार केला.

दरम्यान १८ सप्टेंबर २०२५ रोजी आरोपी सी अमरनाथ पुन्हा शहरात आला. यावेळी त्याने थेट डॉक्टर महिलेच्या घरापर्यंत येण्याची मजल केली. यामुळे घाबरलेल्या महिलेने संपूर्ण प्रकार पतीला सांगितला. डॉक्टर महिलेच्या तक्रारीवरून वेदांत नगर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तेलंगणा येथून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com